नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

कविभूषण प्रा. बळवंत गणेश खापर्डे यांचा

'गोविंदाग्रजां' वरील प्रबंध

शिवाय

सौ. उषा लिमये
द. चिं. सोमण
जगन्नाथ टकसाळी
बाबा मोहोड
तुळशीराम काजे
उ. रा. गिरी
प्र. द. मोहरीर

आणि

वि. सा. संघाच्या परीक्षांचे निकाल

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

मार्च १९५४

किंमत आठ आणे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

वर्ष ८ वें   मार्च १९५४   अंक १२ वा

'गोविंदाग्रज'

अथवा

राम गणेश गडकरी ह्यांचा कवि ह्या नात्याने विचार

(विदर्भ साहित्यसंघ गडकरी-स्मारक समितीच्या विद्यमानें, गडकरी-स्मृतिदिन, दि. २३ जानेवारी १९५४ रोजीं झालेलें कविभूषण प्राध्यापक बळवंत गणेश खापर्डे ह्यांचें भाषण)

कै. गडकरी यांचें लेखन तीन प्रकारचें आहे हें प्रसिद्धच आहे; एक कविता; दुसरें नाटकें; तिसरें विनोदी लेख.

हें तीन प्रकारचें लेखन त्यांनी तीन नांवांखाली केलें. जितकें कवितात्मक लेखन तितकें सर्व 'गोविंदाग्रज' ह्या नांवाने केलें. नाटकें सर्व राम गणेश गडकरी ह्या आपल्या खऱ्या संपूर्ण नांवाने प्रकाशित केलीं आणि आपले सर्व सुंदर विनोदी लेख 'बाळकराम' ह्या टोपण–नांवाने लिहिले.

ह्या त्यांच्या तिन्ही प्रकारच्या लेखनाविषयीं बोलतों म्हटलें तर एका भाषणाच्या मानाने तो विस्तार फार होतो; आणि एकाहि प्रकाराविषयी पुरतें कांही सांगितलें जात नाही, असें आढळून आलें; म्हणून मी त्यांच्या 'कवि' ह्या रूपाने दिसून येणाऱ्या एकाच अंगाविषयी आज बोलण्याचें ठरवलें आहे. आणि म्हणूनच माझ्या ह्या भाषणाचा विषय मी 'गोविंदाग्रज' असा घेतला आहे; 'राम गणेश गडकरी' असा घेतला नाही. शिवाय, गतवर्षीच श्री. गोमकाळे गडकऱ्यांच्या नाटकांविषयी ह्याच जागीं बोलून गेलेले आहेत; श्री. रा. ग. हर्ष्यांचें गडकऱ्यांच्या कवितांचा परामर्ष घेणारें पुस्तक प्रसिद्ध होऊन मात्र सुमारें पाव शतक होत आलें; आणि माझे विचारहि श्री. हर्ष्यांच्या विचारांपेक्षा निराळे आहेत; म्हणून मी आज येथें गडकऱ्यांचा 'कवि' ह्या नात्यानेच विचार करण्याचें ठरविलें आहे.

पण मी असा विषय आपल्यासाठी आखून घेतला असला तरी कांही मूलभूत प्रश्नांचा विचार केल्यावाचून पुढे जातां येत नाही.

(अ) ह्यापैकी अगदी पहिला महत्त्वाचा प्रश्न हा की, गडकरी मूलतः आणि स्वभावतः कवि, की नाटककार, की विनोदी लेखक ?

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माझ्या मतें ते मूलतः नाटककार. गडकरी प्रथम मासिक 'मनोरंजना'च्या द्वारा कविता करणारे म्हणून लोकांपुढे आले हें खरें, पण त्यांनी जर नाटकें लिहिलीं नसतीं, आणि तीं इतकीं लोकप्रिय झालीं नसतीं, तर त्यांना आज मराठी वाङ्मयांत जें स्थान आहे, आणि आज जी कीर्ति झालेली आहे, ती दोन्ही, केवळ कवि या नात्यानें, त्यांना प्राप्त झाली असती की नाही, याची शंका आहे. गडकऱ्यांचे जे विशिष्ट आणि डोळे दिपविणारे गुण, म्हणजे भाषेच्या अद्भुत चमत्कारांचे ताटवेच्या ताटवे, कोटयांची आणि त्यापासून उत्पन्न केलेल्या खळखळाटाच्या विनोदाचीं मनोरम कारंजीं, आणि उत्कट प्रसंग आणि भडक भावना ह्यांचे उत्तुंग वृक्ष, हे सर्व एकदम एकत्र आणून आपल्या गुणांची बाग सजवून दाखविण्याला त्यांना अवसर नाटकांत किंवा कादंबरींतच होता; कवितेंत नव्हताच. गडकऱ्यांपेक्षा सरस कवि आधुनिक मराठी कवींत झाले नाहीत असें नाही. पण त्या बिचाऱ्यांचीं कोठें स्मारकेंहि होत नाहीत, किंवा गडकऱ्यांच्या प्रमाणे कोणी त्यांचे स्मृतिदिन साजरे करीत नाहीत! किंबहुना, कोणी त्यांची आता फारशी आठवणहि काढीत नाहीत! ह्याला कारण एकच,—गडकऱ्यांचीं नाटकें. ह्यांनीच गडकऱ्यांना आज आहे हें स्थान प्राप्त करून दिलें. ते होते तसेच कवि असते, आणि त्याच्या जोडीला नाटककार नसतां, आजच्यासारखेच 'बाळकराम' म्हणजे विनोदी लेखक असते, तरी त्यांना आज प्राप्त झालें आहे हें पद प्राप्त झालें नसतें. गडकऱ्यांना प्रसंग रंगवितां येतात, प्रसंगांत त्यांना भावना घालतां येते; पण कवितेंतल्याप्रमाणे नुसती किंवा स्वतंत्र भावना त्यांना रंगवितां येत नाही. आणि असे 'प्रसंग' नाटकांत किंवा कादंबरींतच रंगविण्यास हातीं सापडतात. कवितेंत ते सापडावे म्हणून कुंडल कृष्णाकाठाला खेचून आणून शाहिरी पद्धतीचें प्रेमकाव्य लिहिण्याचा प्रयत्न करावा लागतो; आणि तोहि नाटकाइतका यशस्वी कधी न होतां, शेवटीं अपुरा राहतो. गडकऱ्यांच्या कवितेंत जितक्या म्हणून उत्कटतम भावना व्यक्त झाल्या आहेत त्या सर्व वैयक्तिक आहेत; कल्पनाश्रित नाहीत. वैयक्तिक उत्कट सुख-दुःखात्मक भावनेने प्रत्येकच मनुष्य आपआपल्या सामर्थ्याप्रमाणे कमी–अधिक "कवि" होतो. ह्याचा अनुभव, स्वतःचें लग्न, प्रथमप्रियदर्शन, पहिल्या अपत्याची प्राप्ति, पतीचें, पत्नीचें, किंवा अपत्याचें निधन वगैरे प्रसंगीं कोणाला आलेला नाही? मग गडकऱ्यांसारख्या कल्पनाप्रधान, बुद्धिमान, शिकल्या-सवरलेल्या, प्रेमपाशांत सापडलेल्या काव्यप्रवण प्रवृत्तीच्या उपजत नाटककाराच्या हातूनहि अशा प्रसंगीं जर कांही उत्कट भावनामय कविता लिहिल्या गेल्या तरी त्यांचें श्रेय त्यांच्या कल्पनाशक्तीपेक्षा त्या सांसारिक अनुभवाच्या उत्कटतेलाच जास्त आहे. अशा वैयक्तिक उत्कट भावनेने तात्पुरता कवि बनलेल्या एका लेखकाचें फार सुंदर उदाहरण बंगाली वाङ्मयांत माझ्या पाहण्यांत आलें आहे. ह्या गृहस्थाची "शुभदृष्टि" झाली. "शुभदृष्टि" म्हणजे, बंगालमधल्या रीतीप्रमाणे, बालविवाह झाला असला तरी, लग्नाच्या पहिल्या रात्रींच पतिपत्नींची एकच दिवस होणारी पहिली भेट. बायको फार सुंदर होती. पण त्या दोघांची पुनः जन्मांत कधीहि भेट झालीच नाही! बायको मरून गेली! तेव्हा त्या माणसानें "उद्भ्रान्त प्रेम" नांवाचें अप्रतिम मनोहर काव्यमय पुस्तक बंगालींत त्या मृत पत्नीला उद्देशून लिहिलें. पुढे कांही दिवसांनी तो सबजज्ज किंवा असा कांही सरकारी अधिकारी झाला. त्याने दुसरें लग्न केलें. संपलें! त्याने "उद्भ्रान्त प्रेम" पुस्तकाच्या पूर्वी एक अक्षर कधीहि लेखन म्हणून लिहिलें नव्हतें, आणि नंतरहि जन्मभर लिहिलें नाही! असें असल्यामुळे गडकऱ्यांच्या ह्या वैयक्तिक कवितांना मी प्रतिभाजन्य कवितांचा मान देत नाही. वर्डस्वर्थच्या शब्दांत हा spontanious overflow of powerful feelings (उत्कट भावनांचा सहजोद्रेक) असला तरी तो recollected emotion (स्मृतिविषय झालेली भावना) नाही. तर हा खराखुराच अनुभव आहे. श्रेष्ठ काव्य हें भावनांचें आणि अनुभवाचें प्रतिभेच्या कल्पवृक्षाच्या छायेंत बसून केलेलें रवंथ असतें. म्हणून गडकऱ्यांचें ह्या प्रकारचें काव्य हें व्यवहाराचें किंवा प्रत्यक्षानुभवाचें कवितावद्ध वर्णन आहे. श्रेष्ठ काव्य हें कल्पनाश्रित आणि प्रतिभाजन्य असतें. हाच काव्य आणि प्रत्यक्षानुभवह्यांत भेद आहे. दोहोंतहि 'भावनाच' उद्दीपित होत असते; पण व्यवहारांतील भावना प्रत्यक्षानुभवाची असते; आणि काव्यगत भावना ही कल्पनाश्रित असते. कल्पनाश्रित भावनेलाच 'रस' म्हणतात. प्रत्यक्षानुभवाला नव्हे. ह्या कल्पनाश्रिततेमुळेच ह्या काव्यानुभवाला साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकर "दोन भूमिकांवरचा अनुभव" ऊर्फ "सविकल्प समाधि" म्हणतात. ह्या दोन भूमिकांवरच्या अनुभवांत उभयविध तादात्म्य असतें. जो नट अंशतः आत्मविस्मृति करून घेऊन

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आपल्या भूमिकेशीं मुळीच तादात्म्य पावत नाही, तो अरसिक आणि रुक्ष असल्यामुळे त्याच्याने उत्तम म्हणजे सरस अभिनय कधीहि होणार नाही. "सोऽस्मीति मनसा स्मरन्" असा अभिनय करावा, असें भरतमहामुनि नाट्यशास्त्रांत सांगतात. पण जो नट संपूर्णपणें आपण कोण आहों हें विसरून जातो आणि सर्वस्वी दुसरी व्यक्ति बनतो, तो 'वेडा' आहे; नट नव्हे. ज्याला अंशतः उभयविध तादात्म्य आहे, आणि अंशतः उभय-विध विस्मृति आहे, तोच खरा नट. काव्य हा मानसिक किंवा आन्तरिक अभिनय आहे, आणि अभिनय हें शारीरिक काव्य आहे. इतकेंच नव्हे, तर सर्वच ललित कला हें कौशल्यरूपाने व्यक्त झालेलें शारीरिक काव्य आहे. ललितकला आणि काव्य ह्या दोहोंतहि भावनाच व्यक्त होते; पण दोहोंत अंतर इतकेंच की, ललितकलांच्या अभिव्यक्तीला शारीरिक कौशल्याची गरज आहे; आणि काव्य हें मात्र केवळ शब्दांत व्यक्त होतें. शब्द हें शारीरिक कौशल्यात्मक साधन नाही, केवळ मानसिक साधन आहे. म्हणून काव्य ही ललितकला नाही. ग्रीक लोक तसें मानीत; आणि आपणहि इंग्रजांच्या द्वारा त्यांचें अनुकरण करून अलीकडे तसें बोलूं लागलों आहों; पण ती चूक आहे. ग्रीक काय, सर्वच ज्ञानाला, गणितालासुद्धा, कला म्हणत. म्हणूनच ग्रीकांच्या अनुकरणाने पुस्तकी विद्यांच्या कॉलेज-लाहि "आर्टस् कॉलेज" म्हणण्याचा चुकीचा प्रघात पडला. पण तो कल्पनांचा गोंधळ आपण कां स्वीकारावा? असो. कै. वामन मल्हार जोशांचे 'सविकल्प समाधी'च्या उपपत्तीवरचे सर्व आक्षेप मला माहीत आहेत. पण त्यांचें उत्तर देण्याचें हें स्थळ नव्हे. हीच कल्पना आणखी एका निराळ्या तऱ्हेने सांगतां येईल. शुद्ध भावनेचें निःस्वार्थी सुंदर खोटें म्हणजे काव्य आणि ललितकला; आन्तरिक आणि शब्दात्मक असतांना तें काव्य, आणि बाह्यरूपात्मक आणि शरीरकौशल्यात्मक असतांना ती ललितकला. मात्र ह्या चारहि गोष्टी त्यांत असल्याच पाहिजेत. त्यांतील एकहि नसली किंवा कमी असली तर चालणार नाही. असो. ह्याच उभयविध तादात्म्याच्या-'सविकल्प समाधी'च्याच-कल्पनेला श्री. माडखोल-कर ह्यांनी 'सास्मित समाधि' हें थोडें अधिक कठिण आणि अपरिचित नांव सुचविलें आहे; ह्याशिवाय त्यांत कांहीहि भेद दिसत नाही. तेंच गडकऱ्यांच्या "राजहंस" ह्या कवितेला मात्र हा मघाचा वैयक्तिक भावनेचा आक्षेप लागू पडत नसल्यामुळे, आणि ती कविता खरोखरीच कल्पनाप्रेरित आणि प्रतिभास्फुरित असल्यामुळे, ती मात्र गडकऱ्यांच्या काव्यसंसारांत रत्नासारखी चमकत राहते. अर्थात् काव्य हें "जित्या जिवाचें जातिवंत करणेंच" बनण्यासाठी तें बेंबीच्या देठापासूनच निघालेलें असलें पाहिजे; आणि तें तसें निघण्याला कवीला तो अनुभव स्वतःला कांही अंशीं तरी पाहिजेच, तेव्हाच तो जळता स्फुलिंग प्रतिभेची फुंकर घालून काव्यरूपाने दैदीप्यमान प्रकाशमय अग्नीच्या स्वरूपांत फुलवून दाखवितां येईल; नाहीतर तें काव्य निर्जीव आणि नीरस बनेल, हें अक्षरशः खरें आहे. पण मग हा त्याचा अनुभवच, गडकऱ्यांच्या गूढगुंजनात्मक कवितांतल्याप्रमाणे, कांहीतरी असामान्य तरी असावा, किंवा तो असा असामान्य नस-ल्यास सामान्य अनुभवाची कांही तरी एकअपूर्व सूक्ष्म छटा प्रतिभासामर्थ्याने त्याने असामान्य अनुभवाच्या उत्कटतेला आणून पोचविलेली असावी; तेव्हाच त्या त्या वैयक्तिक अनुभवाला काव्यपदवी प्राप्त होईल; एरव्ही होणार नाही. नाहीतर तो रुक्ष असा नित्यव्यवहाराचा निर्जीव फोटोग्राफ होईल. गडकऱ्यांच्या उच्च वैयक्तिक आध्यात्मिक अनुभवांच्या कवितांबद्दल मी शेवटीं बोलणारच आहें. गडकऱ्यांच्या ह्या प्रस्तुत प्रेमविषयक वगैरे वैयक्तिक कवितांत असा असामान्य अनुभवहि नाही. किंवा सामान्य अनुभवा-च्या लोखंडाचें प्रतिभेच्या परिसाने सोनेंहि केलेलें नाही. ही निव्वळ वैयक्तिक दुःखाची कहाणी आहे. तिच्यामुळे गडकऱ्यांविषयी सहानुभूति वाटते, गडकऱ्यांची स्थिति पाहून मनाला वाईट वाटतें, पण त्या कवितांत काव्यानंद उत्पन्न होत नाही. म्हणूनच अखेर, गडकऱ्यांना भावना प्रसंग द्वाराच म्हणजे नाटकांतच रंगवितां येते, स्वतंत्रपणे नव्हे; म्हणजे ते मूलतः नाटक-कार होते, कवि नव्हत, असेंच म्हणावें लागतें.

त्यांच्या लेखनाची महत्वाकांक्षा पाहिली तरी हेंच सिद्ध होतें. अठरा नाटकें, अडीचशें कविता, पांच कादंबऱ्या, आणि पंचवीस विनोदी लेख, हें त्यांचें संकल्पित लेखन होतें. पैकी कादंबरी एकहि झाली नाही. विनोदी लेखहि थोडेच झाले. मात्र वयाच्या अगदी सहाव्या किंवा सातव्या वर्षीं त्यांनी 'सुरसुंदरी' म्हणून गुजराथी नाटक सर्वांत आधी लिहिलें, ही गोष्ट येथें लक्षांत घेण्याजोगी आहे. त्यानंतर सुमारें पूर्ण चार वर्षें उलटल्यावर मग त्यांचा आपल्या अगदी पहिल्या चुट्पुट्त्या कवितेला हात लागला. थोड्याच वर्षांनी "मित्रप्रीति" हें मराठी नाटक त्यांनी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लिहिलें. तें आज उपलब्ध नाही. पाठोपाठ "गर्वनिर्वाण" नाटक झालें. तें त्यांनीच आपल्या अत्यंत भित्र्या स्वभावामुळे दोनदा लिहून पोलिसांच्या भीतीने आपल्याच हाताने जाळून टाकलें? कवितेचें लेखन हें नाटकाच्या लेखनापेक्षा पुष्कळच आटोपशीर असल्यामुळे त्या मात्र उण्यापुऱ्या आणि लहानमोठ्या सुमारें दीडशे झाल्या. पण कॉलेज सोडतांच ते नाटकाकडेच वळले, हीहि गोष्ट येथे पाहण्याजोगी आहे. आणि त्यानंतर त्यांनी लिहिलेलीं आणि प्रसिद्ध असलेलीं पांच नाटकें हींच फक्त जमेस धरलीं, आणि त्यापूर्वीचीं सोडून दिलीं, तरी गडकरी ज्या अल्पवयांत वारले त्याकडे लक्ष देतां, त्यांच्या संकलित अठरा नाटकांपैकी तीं प्रमाणत: पुष्कळच जास्त, म्हणजे सुमारें एकतृतीयांश आहेत, हीहि गोष्ट पाहण्याजोगीच आहे. कदाचित् नाट्यलेखन हा त्यांचा उपजीविकेचा व्यवसाय होऊन बसल्याने असें झालें असें म्हणतां येईल. पण झालें तें असें झालें खरें; आणि नाटकाकडेच त्यांचा खरा आंतून ओढा होता, असें वाटण्याला हीहि आणखी एक जागा झाली खरी. असो.

(आ) दुसरा प्रश्न म्हणजे, गडकऱ्यांच्या मनाचा घाट कसा होता हा. ज्या मनोभूमिकेंतून हें सर्व लेखन बाहेर पडलें ती भूमिका कशी होती, हें नीट आकलन झालें म्हणजे त्याच भूमिकेंतून निघालेल्या ह्या लेखनाचाहि बोध आणि उलगडा नीट होईल.

आपल्याला येथे गडकऱ्यांच्या व्यवहारांतील संपूर्ण स्वभावाचें अवलोकन करण्याची आवश्यकताहि नाही, आणि सवडहि नाही. आपल्याला फक्त लेखक किंवा कवि ह्या नात्याने त्यांचा जो स्वभाव होता, त्याचाच फक्त विचार करावयाचा आहे. पण तरी त्यांच्या व्यावहारिक नित्य स्वभावांतील एक दोन गोष्टींचा अन्तर्भाव आपल्याला आपल्या विषयांत कांही अंशीं करणें भागच पडेल.

अनुकरणवुद्धि, कल्पकता, अतिरेकीपणा, तल्लख वुद्धिमत्ता, भडकपणाचें प्रेम, तीव्र अहंकार, जबरदस्त महत्वाकांक्षा, आणि ह्या सर्वांच्या हुकमतींत सापडलेली भावना, अशी मला गडकऱ्यांची मनोरचना दिसते.

ह्यांत कोणी कदाचित् अनुकरणप्रियतेच्या ऐवजी कल्पकतेला पहिलें स्थान देईल, आणि अनुकरणप्रियतेला दुसरें स्थान देईल, यापेक्षा कोणीहि कांही यांत वदल करील, असें वाटत नाही.

गडकऱ्यांची अनुकरणप्रियता सिद्ध करण्याला दूर जावयाला नको. अरविंद बाबूंना प्रथम पाहिल्यावर कांही दिवस ते डोक्याला कांही न घालतां बंगाली लोकांप्रमाणे एक कापड पांघरून हिंडत असत, हें प्रसिद्धच आहे. 'गर्वनिर्वाण' 'प्रेमसंन्यास', 'राजसंन्यास', 'पुण्यप्रभाव', 'भाववंधन', हीं त्यांच्या नाटकांचीं नांवें सर्व पांच-अक्षरी, दोन शब्दांचीं बनलेलीं, आणि त्यांतील पहिला शब्द दोन अक्षरांचा, आणि दुसरा शब्द तीन अक्षरांचा, अशीं असलेलीं आहेत. हें श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचें हुवेहूब अनुकरण आहे. तात्यासाहेबांच्या यच्चयावत् सर्व नाटकांचीं नांवें या नियमांनीच निरपवादपणे वनलेलीं आहेत. म्हणूनच तात्यासाहेब कोल्हटकरांना त्या काळीं गमतीने "पंचाक्षरी" म्हणत असत. कोटचा करण्याची गडकऱ्यांना स्फूर्ति झाली ती तात्यासाहेवांच्या अनुकरणामुळेच. 'एकच प्याला' या गडकऱ्यांच्या उरलेल्या एकाच नाटकाचें नांवहि पांच-अक्षरीच आहे; पण त्यांत दोन-अक्षरी आणि तीन-अक्षरी शब्दांचा क्रम बदलला आहे, इतकेंच काय तें. 'स्मशानांतील गाणें', 'दसरा', वगैरे रुक्ष आणि अगदी प्रचारकी कविता केशवसुतांच्या अनुकरणाकरिताच त्यांनी लिहिल्या. ह्यांपैकी पहिल्या कवितेंत रात्रीचें वर्णन तरी प्रारंभीं चांगलें आहे. दुसरींत तर प्रचारकीपणाशिवाय कांहीच नाही. दोन्ही 'अरुण', 'पाखरास', 'गोफ', वगैरे कविता, किंवा त्यांचीं नांवें, स्पष्टपणे वालकवींच्या अनुकरणार्थ आहेत. 'सत्सुमदाम', मोरोपंतांचें अनुकरण आहे. 'बंड्याची चित्रकला', 'प्रेमकाळ', 'पहिलें चुंबन', 'गोड निराशा', 'हायहाय', वगैरे कविता बायरन्, कँपियन, वगैरें इंग्रजी कवींच्या कवितांवरून लिहिलेल्या आहेत. 'अनामिकाचे अभंग' हें तुकारामाचें अनुकरण आहे. याशिवाय संस्कृत कवि, शेले, मराठी जुनेकवि आणि शाहीर वगैरेंची उसनवारी गडकऱ्यांनी केली आहे.

त्यांची कल्पकता तर जागोजागींच दिसते; पण 'घुवडास' ह्या एकाच कवितेच्या उदाहरणावरूनहि ती विपुल प्रमाणांत प्रत्ययास येते. गडकऱ्यांचा अतिरेकीपणाहि ह्याच कवितेवरून स्पष्टपणें दिसून येतो. ही त्यांची उत्तमपैकी एक कविता आहे. त्यांचे जवळजवळ सर्व विशिष्ट गुण ह्या कवितेंत ठळकपणे आढळून येतात.

त्यांची वुद्धिमत्ता त्यांच्या कोटिबाजपणांत प्रत्ययाला येते. 'बालक चुंबन' (११ वी कविता), 'गुलावी कोडें' आणि 'विराम चिन्हें' ह्या त्यांच्या मला कोटिबाज कविता वाटतात.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भडकपणा तर त्यांच्या लेखनांत आहेच. किंबहुना, गडकऱ्यांच्या कविता, आणि विशेषतः नाटकें, सर्वत्र भडकपणानें, कृत्रिमतेनें, आणि दिखाऊपणानें, भरलेलीं आहेत. त्यांत नाजूक आणि कोमल अशा भावना क्वचित्. त्यामुळें बऱ्याच ठिकाणीं त्यांचें लेखन, बालकवींच्या कवितेप्रमाणें, मोजकें आणि सुंदर पण मोलवान् दागिने अंगावर घातलेल्या घरंदाज रूपवती स्त्रीसारखें न दिसतां, भडक रंगाचें लुगडें नेसलेल्या आणि अंगावर जाडेजुडे सोन्याचे दागिने गुंडाळलेल्या स्त्रीसारखें दिसतें. पण अर्थात् तें कोठे कोठे सुंदर आहेच.

त्यांचा तीव्र अहंकार 'घुबडास', आणि 'हृदयशारदेस', ह्या कवितांत, थोडा 'अनामिकाच्या अभंगां'तहि, 'ये ये ये कविते'—मध्ये, 'निजलेल्या बालकवी–'स ह्या कवितेच्या अखेरीस, पण विशेषतः 'पुत्रशोक', 'जीवास बोध', 'कृष्णाकाठीं कुंडल', आणि 'हृदयास' ह्या कवितांत तर फारच उग्रपणें, प्रत्ययास येतो. 'राजहंस' ह्या कवितेनें आणि त्यांच्या नाटकांनी फार लवकर मिळालेल्या कीर्तीचा हा परिणाम होय. 'बी' कवींना पचली तशी गोविंदाग्रजांस आपल्या ह्यातींत झालेली कीर्ति पचली नाही. खाडिलकरांच्या 'स्वयंवर' नाटकाच्या पहिल्या प्रवेशांत कृष्ण हा शिशुपाल आणि रुक्मी ह्या दोघांना दोन हातांनी धरून रंगभूमीवर प्रवेश करतो, हें दृश्य पाहतांना एकदा गडकरी एकदम उद्गारले, "कोल्हटकर आणि खाडिलकर ह्या दोघांना घेऊन मीहि असाच मराठी रंगभूमीवर आलों आहें." ! ही वस्तुस्थिति आहे असेंहि धरून चाललें, तरी ही दर्पोक्ति आहे असें कोण म्हणणार नाही ? गडकरी पुढे पुढे 'महाराष्ट्र गीत', 'लोकमान्यांस भरतवर्षाचा आशीर्वाद', 'काव्याची व्याख्या', व विशेषतः 'पुत्रशोक' ह्यासारख्या कवितांतल्याप्रमाणे जें मनमानेल तें असंबद्ध मध्ये वाटेल तितक्या विस्तारानें खुशाल दडपून देऊन भरमसाट लिहूं लागले, तो त्यांच्या ह्या 'वन चुके' अहंकारी वृत्तीचाच परिणाम होय. 'स्मशानांतील गाणें' ह्या कवितेंत हिंदु देवतांविषयी त्यांनी जे हिडिस उद्‌गार काढले आहेत, तेहि ह्या लेखक किंवा कवि म्हणून झालेल्या, आणि सुधारकीपणाच्या, अहंकारामुळेच.

(इ) ह्यानंतरचा गडकऱ्यांच्या ह्याच मनोरचनेसंबंधाचा पुढला प्रश्न असा की, त्यांच्या काव्यनिर्मितीच्या प्रक्रियेंत मनुष्याच्या अंतस्थ घटकांपैकी, किंवा शक्तींपैकी कोणत्या शक्ति कोणत्या क्रमानें कामास येत असत ? बुद्धि किंवा विचार (मन), भावना (अंतःकरण), कल्पना, स्फूर्ति, वगैरे घटकशक्ति अर्थात् सर्व मनुष्यप्राण्यांत त्याच असणार आणि असतात. प्रत्येकांतील त्यांच्या प्राधान्याच्या क्रमांत आणि मिश्रणाच्या प्रमाणांत मात्र भेद असतो.

माझी स्वतःची कल्पना अशी आहे की, स्फूर्ति किंवा प्रतिभा नामक एका दैवी किंवा अगम्य अशा आत्म्याच्या शक्तीनें गति दिलेल्या कल्पनेच्या फिरत्या चाकावर भावनेची माती जोरानें फिरत असतांना, आत्म्याचेच बुद्धिरूपी हात त्या मातीला योग्य तो काव्यघटाचा आकार देण्याकरितां त्या मातीभोवती फक्त धरलेले असतात, आणि तो आकार देण्याचेंच तेवढें काम करतात; आणि ह्याप्रमाणे माणसांतील यच्चयावत् सर्व अंतस्थ घटकशक्ति काव्यनिर्मितीच्या वेळीं उपयोगांत येतात. ह्यांत कोठेहि बदल किंवा कमी–अधिकपणा झाला की काव्यनिर्मितीची घडी बिघडलीच. म्हणजे काव्याचें उपादानकारण भावनाच पाहिजे. बुद्धि हें फक्त निमित्तकारणच राहिलें पाहिजे. तीच स्थिति कल्पनेची. पण गडकऱ्यांकडे पाहूं जातां मनुष्याच्या ह्या अंतस्थ शक्तींपैकी गडकऱ्यांचा मूळ स्वभाव 'भावना' दिसून येत नाही, तर कल्पना हा दिसून येतो; आणि हें कल्पनेचें चाक जोरानें फिरत असतें, आणि त्याच्यावर भावनेची मातीच मुळी मडकें तयार करण्याकरिता ठेवलेली नसते, असा पुष्कळ वेळा त्याच्या काव्यांत प्रसंग येतो. घुबडास' या कवितेचा बराचसा भाग, त्याचप्रमाणे त्यांचे दोन्ही 'अरुण', 'हलत्या पिंपळपानास', 'चिमुकलीच कविता', वगैरे त्यांच्या उत्प्रेक्षामय, अचाट कल्पनांनी भरलेल्या, कविता पाहिल्या, म्हणजे हाच अनुभव येतो. ह्यांत 'घुबडास', आणि 'चिमुकलीच कविता', ह्या कविता चांगल्या आहेत. बाकीच्यांत मुळांत कांही प्राणच वाटत नाहीहीच स्थिति कमी–अधिक प्रमाणांत त्यांच्या बऱ्याच कवितांत आढळून येते. याप्रमाणे, भावना नव्हे, तर कल्पना त्यांच्या काव्यरचना–क्रमांत प्रथम येते. म्हणूनच ते मूलतः नाटककार, मूलतः कवि नव्हत. मग या कल्पनेच्या पाठोपाठ तिला मदत करण्याला ते सर्रास प्रथम आपल्या बुद्धीचा उपयोग करतात. म्हणजे जिने नियंत्रण करावें ती बुद्धीच स्वतः त्या कल्पनेच्या भडकत्या आगींत आणखी तेल ओतावयाला तेथें धावून येते. कल्पना आणि बुद्धि यांचा संगम म्हणजेच कोटि, उत्प्रेक्षा

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रूपक. उपमाहि यांतच येईल. पण ती मात्र त्यांच्या काव्यांत फारशी कोठें येत नाही. त्यांच्या नाटकांतील कोटयांचा सुकाळ सांगावयालाच नको आणि या दोघीनंतर मग त्यांच्या काव्यांत आणि लेखनांत तिसऱ्या क्रमांकाला भावना येते. म्हणूनच त्यांच्या कल्पनाश्रित भावनामय ऊर्फ शुद्ध रसात्मक अशा 'राजहंसा'सारख्या कविता फारच कमी त्यांच्या काल्पनिक तितक्या कविता प्राय: सर्व कल्पनाप्रधान, बुद्धिप्रधान किंवा कोटीबाज आहेत; त्यांच्यांत फक्त कल्पनांची कसरत आणि बुद्धीचा लखलखाट किंवा चमक आहे; आणि उत्कट भावनामय तितक्या कविता प्राय: वैयक्तिक आहेत. गडकऱ्यांचा सर्व भर अद्भुततेवर आहे; आणि ही अद्भुतता त्यांना कल्पनेची, तिच्या मांडणीची, शब्दांची, आणि अनुप्रासांची, अशी सर्वच प्रकारची पाहिजे. कोटि त्यांना प्रिय, चमत्कारजनक म्हणूनच. कल्पना आणि भावना ह्यांची साक्षात् किंवा समक्ष भेट त्यांच्या कवितेंत किंवा अंतरंगांत कधी सहसा होतच नाही; त्या दोघींच्यामध्यें नेहमी बुद्धि आडवी आलेली असतेच. ह्यामुळेच त्यांच्या सर्व लेखनाचे, चमत्कार, अद्भुतता, कोटि आणि कृत्रिमता, हे चार प्राण होऊन बसले, आणि अनुप्रास हाहि चमत्कार ह्या नात्यानेच ह्या चौघांस येऊन मिळून त्यांच्या लेखनाचे पंचप्राण बनले. ह्या चमत्काराच्या आवडीमुळेच त्यांना मोरोपंत आवडे आणि त्यांनी सबंध वाचला; आणि ज्याला भाषाप्रभुत्व पाहिजे त्याने वाचला पाहिजे, असें ते म्हणत. म्हणून गडकऱ्यांचें लेखन वाचून "O poet, thou speakest what I feel" (हे कवे, माझ्या अंत:करणांतील भावनाच तूं बोलून दाखवीत आहेस.) असे उद्गार तोंडीं येत नाहीत; तर, "मला सुचलें नाही तें तुला सुचलें", एवढेंच वाचकाला त्यांना म्हणावेसें वाटतें. हें बुद्धीने दिपविणें आहे. भावनांनी उचंबळून सोडणें किंवा मोहून टाकणें नव्हे. ह्याच्या अगदी उलट बालकवि आणि रेव्हरंड टिळक आहेत. तेथें शुद्ध भावनांची लयलूट आहे. नाहीतरी, खरा रसिक, आणि खरा कवि ह्यांत अंतर इतकेंच आहे,—बोलका रसिक तो कवि, आणि मुका कवि तो रसिक.

याप्रमाणे गडकऱ्यांच्या अंतरंगाचा आणि ओघाने त्यांच्या कांही कवितांचा विचार थोडक्यांत झाल्यावर आता आपण थोडें त्यांच्या गद्याकडे आणि भाषेकडे वळूं. त्यांच्या 'अनामिकाचे अभंग', 'कांही कविता वाचून', 'जीवितास', 'समसमां संयोग की जाहला', वगैरे कवितांच्या प्रारंभीं प्रस्तावनापर अशा दिलेल्या टीपांचा अर्थ ज्याला पूर्ण कळेल, किंवा निदान एकदम कळेल, तो मनुष्य असामान्यच असला पाहिजे. 'एका बालकवीस' ह्या कवितेची प्रस्तावनात्मक टीप अशी आहे:––"१४ वर्षें वयाच्या एका बालकवीची श्रुतिमनोहर, बऱ्याच प्रमाणांत अर्थशून्य, तथापि प्रतिभापूरित, अतएव गोड, कविता वाचल्यानंतर मनाला वाटलेला आनंद पुढील शब्दांत अवतीर्ण झाला आहे." "बऱ्याच प्रमाणांत अर्थशून्य, तथापि प्रतिभापूरित, अतएव गोड," ह्या शब्दांवर माझा कटाक्ष आहे. प्रतिभापूरित असतें तें अर्थशून्यहि असूं शकतें काय? अर्थशून्यच जें आहे तें प्रतिभापूरितहि असूं शकतें काय? जें अर्थशून्यच आहे तें गोड कसें? केवळ श्रुतिमनोहर आहे म्हणून? काय ह्या टीपेचा अर्थ करावयाचा? 'अभिनंदनपर वर्धापन' यांतील 'वर्धापन' याचा अर्थ काय?

गडकऱ्यांच्या नाटकाच्या गद्याकडे पाहिलें तरी हाच अनुभव अनेक जागीं यतो. त्यांनी आपल्या "राजसंन्यास" नाटकाचे कांही प्रवेश कै. तात्यासाहेब केळकरांना वाचून दाखविल्यावर "वाक्यांचा अर्थ लोकांना कळणार नाही," असें त्यांनी गडकऱ्यांना स्वच्छ बजावलें. गडकऱ्यांनी आपल्या गद्यभाषेकडून सर्कशींतील अद्भुत कामें करवून घेतलीं, आणि तीं डोळे दिपविणारीं आणि करमणूक करणारीं आहेत, हें मात्र कबूल करावें लागेल. बहुतेक लेखकांचें गद्य सोपें, आणि असलेंच तर पद्य कठिण असतें. पण गडकरी हे असे आश्चर्यकारक आणि अपवादभूत लेखक आहेत की, त्यांचें पद्य सोपें आहे, आणि गद्य कठिण आहे! ह्याचें कारण, पद्य त्यांनी निष्काळजीपणाने लिहिलें, आणि गद्य फाजील काळजीने लिहिलें. कारण, पद्याबद्दल, "मी मोठा कवि आहेच," हा अहंकार होता आणि गद्याबद्दल, "कुणी लिहिलें नाही, असें मी लिहून दाखवीन," ही महत्वाकांक्षा होती. त्यांच्या महत्वाकांक्षेच्या पुष्कळ गोष्टी त्यांच्या आठवणींत नमूद आहेत. ह्या पद्याच्या अहंकारामुळेच पद्यांत त्यांनी लिहिलेल्या भाषेला 'वेछूट' हें एकच नांव देतां येण्याजोगें आहे. एकीकडे, 'तावकीन.' सारखे जाडे जाडे संस्कृत शब्द, दुसरीकडे 'इष्केशराब प्याला,' आणि 'जहन्नम्से अस्मान,' आणि तिसरीकडे 'पल्याड' आणि 'वाणी' सारखे अडाणी शब्द. एकीकडे मराठी कवितेंत, 'दुनिया झुकति है, हरदम; नहीं झुकानेवाला' असें संपूर्ण उर्दू चरण, तर दुसरीकडे मराठी कवितेंतच "महाभावजन! सुखं गम्यतां पुनर्दर्शनाय,"

असा मध्येच सबंध संस्कृत चरण ! अशीं कितीतरी उदाहरणें आहेत. ‘ईश्वर नास्ती’ हा प्रयोग तर धड मराठीहि नाही, आणि धड संस्कृतहि नाही ! अशा रीतीने एकंदर त्यांच्या एकोणतीस कवितांत मला बेछूट अपप्रयोग आढळून आले. सात कवितांत चुकीचे प्रयोग आढळून आले. सात कवितांत वृत्तदोष आहेत. दोन जागीं वचनदोषहि आहे. तीन कवितांत लिंगदोष आहे. तीन कवितांत ऱ्हस्वदीर्घ दोष आहे. दोनतीन जागीं अगदी गद्यात्मक चरण आले आहेत. ह्या सर्व कवितांची व्यर्थ नामावली सांगून आपला वेळ घेत नाही. माझ्याजवळ त्यांचें टिपण आहे. ‘अल्लड प्रेमास’ कवितेंत आणि ‘मित्रप्रीति’ नाटकांतील पदांत, वगैरे मध्येच विषयाला सोडून कांहीतरी आलें आहे. माझ्या मतें ह्यांतील कांही जागीं प्रारंभीं नवशिकेपणामुळे कदाचित् दोष घडले असले तरी बाकीचे अहंकाराने उत्पन्न झालेल्या बेछूटपणामुळेच उत्पन्न झाले असावे. सदोष रचना होत आहे हें लक्षांत येऊनहि गडकरी तीच रचना कायम ठेवीत ह्याला पुरावा आहे. ‘रानोमाळ । आंधळ्यांची चाले माळ ॥’ ह्या चरणांतील ‘आंधळ्यांची’ हा शब्दहि न बदलतां किंवा वृत्तहि दुसरें न घेतां, ‘मात्रादोष अगदी अपरिहार्य आहे’ अशी त्यांनी त्या शब्दावर खाली टीप दिली आहे ! नाटकांतील गडकऱ्यांचीं पदें मात्र सोपीं, सरळ आणि निर्दोष झालीं आहेत कारण तेथें त्यांच्या विस्ताराला बंधन होतें. म्हणून त्यांत थोडक्यांत नीटनेटकें गडकऱ्यांना घालावेंच लागलें. बाकीच्या कवितांत पुष्कळ जागीं त्यांची रचना असावी तशी व्यवस्थित नाही. ‘राजहंस’, ‘भीमकवाळा’ आणि विशेषत: फार प्रमुखत्वाने ‘पुत्रशोक’ आणि ‘कृष्णाकाठीं कुंडल’ ह्या कवितांत. ‘हें कोण बोललें बोला’, वगैरे प्रमाणे किंवा ‘वाचकहो, माझ्याबरोबर इकडे या, अशा अर्थाचे चरण घालून, कवितेचा विषय बाजूलाच ठेवून कवीच मध्ये वाचकाशीं बोलूं लागतो, हा दोषहि गोविंदाग्रजांकडून पुष्कळ वेळ झाला आहे.

आता संपूर्ण ‘वाग्वैजयंती’-कडे आपण थोडी दृष्टि टाकूं.

‘वाग्वैजयंती’त ‘वाचकास विनंति’, आणि ‘तडजोड’, ह्या प्रस्तावनावजा कविता सोडून मूळ पुस्तकांत अशा १४९ कविता आहेत. त्यांचा प्रकारवारीने विचार करूं.

(अ) ह्यांपैकी पहिला प्रकार **प्रेमविषयक** कवितांचा. ह्यांत ३८ कविता आहेत. या ३८ कवितांचे सात वर्ग पडतात (१) ‘सर्वसामान्य’ ह्या पहिल्या वर्गात, ‘मोरपिसावरचा डोळा’, ‘ती कोण’, ‘प्रेम आणि मरण,’ ‘प्रेमाची प्रामाणिकता’, ‘प्रेमपाठ’, ‘अल्लड प्रेमास’, ‘प्रेमाखातर’ ‘दुर्दर्शन’, आणि ‘प्रेमशोधन’, ह्या नऊ कविता पडतात. ह्या कवितांत सर्वसामान्य स्वरूपांत प्रेमभावाची महती आणि स्वरूप वर्णन केलेलें आहे. ह्यांत ‘प्रेमपाठ’ ही कविता सर्वांत चांगली आहे. ‘अल्लड प्रेमास’हि चांगली आहे. (२) दुसरा वर्ग **प्रेयसीस**. ह्यांत ‘जुन्या कवितांची आठवण’, ‘हृदयशारदेस’, ‘—स’, ‘निर्वाणीची विनवणी’, ‘त्याच तारकेस याचना’, ‘भयाण एकांत’, ‘एका शब्दासाठी विनंति’ ‘निर्दय बालेस’, ‘गोफ’, ‘शेवटचें प्रेमगीत’, आणि ‘हृदयास’, ह्या अकरा कविता पडतात. ह्या सर्व कविता हृदय पिळवटून लिहिलेल्या आहेत. पण त्यांतल्या त्यांत ‘निर्दय बालेस’, ‘गोफ’, आणि ‘शेवटचें प्रेमगीत’ ह्या तीन कवितांत, आणि त्यांतहि ‘निर्दय बालेस’ ह्या कवितेंत, भाव फार उत्कट आहे. ‘हृदयास’ ह्या कवितेंत मात्र कवि चिडून प्रेयसीला ‘कमअस्सल’, ‘खोटें नकली नाणें’, वगैरे न शोभेल असें फार टाकून बोलला आहे. आणि कवीचा स्वत:च्या काव्याविषयींचा गर्वहि फार उथळपणें तींत व्यक्त झाला आहे; त्यामुळे ह्या कवितेचें गालबोटच ह्या वर्गांतील बाकीच्या कवितांना लागलें आहे असें म्हणतां येईल. ह्या एकीखेरीज बाकीच्या दहा कवितांत कवीने आपल्या प्रेयसीविषयींचें आतलें दृढ प्रेम, तिच्या प्राप्तीची उत्कंठा, तिची विनवणी, तिची प्राप्ति न झाल्याने उत्पन्न झालेली तीव्र निराशा, वगैरेंचें वर्णन भावपूर्ण रीतीने केलें आहे. ही सर्व प्रेमकथा काल्पनिक नसून कवीच्या आयुष्यांत प्रत्यक्ष घडून गेलेली आहे. अलीकडे तर मुंबईच्या एका मासिकाने त्या विचारीचें नांवगावहि प्रसिद्ध करून टाकलें आहे. पण त्याच्याशीं आपल्याला कांही कर्तव्य नाही. ‘जुन्या कवितांची आठवण’ ह्या कवितेंत तर गोविंदाग्रजांनी एकाच जागीं नाही, तर पांच जागीं त्या प्रेयसीचें नांवच मुळांत घालून टाकलें होतें पण पुस्तक छापतांना तें गाळून त्या जागीं दोन दोन फुल्या घातल्या आहेत. यावरून तें नांव दोन अक्षरी असावें असें दिसतें. असो. (३) तिसरा वर्ग, **प्रेमविषयक प्रासंगिक** कविता. ह्या वर्गांत सहा कविता पडतात. त्या म्हणजे ‘अंधाला दृष्टिलाभ,’ ‘पहिलें चुंबन’, ‘हा क्षण’, ‘फुलें वेचलीं पण’— ‘रात्रीं ओरडणाऱ्या घुबडास’, आणि

'समसमां संयोग की जाहला' ह्या होत. या कविता मननपूर्वक वाचल्या म्हणजे हे सर्व, कवीच्या आयुष्यांत प्रत्यक्ष घडून गेलेले प्रसंग आहेत, आणि त्यांचें वर्णन त्यानें करून ठेविलें आहे, असें वाटल्यावांचून राहत नाही. पण रा. ग. हर्षे म्हणतात की, यांतील 'पहिलें चुंबन' ही कविता बायरन्च्या 'The first kiss' ह्या कवितेवरून केलेली आहे. कदाचित् तसेंहि असेल. ही कविता पूर्णपणें आणि उत्तानपणें शृंगारिक आहे. 'रात्रीं ओरडणाऱ्या घुबडास', आणि त्याहूनहि 'फुलें वेचलीं पण' ह्या कवितेंतील भाव फार उत्कट आहे. (४) ह्यानंतरचा गोविंदाग्रजांच्या प्रेमविषयक कवितांचा चवथा वर्ग म्हणजे प्रेमनिराशेच्या कवितांचा. प्रेयसी प्राप्त होत नाही हें दिसून आल्यावरच अर्थात् या कविता लिहिल्या गेल्या. ह्या म्हणजे, 'पुनर्विकसन', 'गीतविरक्ति', 'कधी', 'फणसाचें पान', 'मागे पाहणें', आणि 'मनांतील दिवसरात्र', ह्या सहा होत. ह्या सर्वच कवितांतील भाव फार हृदयस्पर्शी आहे. (५) पुढे मग, प्राप्त परिस्थितीला तोंड देण्याचा निश्चय करून कवीनें आपल्या मनाची समजूत घालण्याचा प्रयत्न केला, तो 'गोफ', 'हृदयास' आणि 'तीन तरी', ह्या तीन कवितांत दिसून येतो. त्यांपैकी 'हृदयास' ह्या कवितेचें विवेचन मघा 'प्रेयसीस' ह्या वर्गांत होऊन गेलेलेंच आहे. 'गोफ़'–मधील भाव कळवळा उत्पन्न करणारा आहे. 'तीन तरी' सामान्य आहे. (६) सहावा वर्ग म्हणजे, ह्याप्रमाणे कंबर बांधून वैषयिक, वैयक्तिक, संकुचित प्रेमाची हृदयांतून एकदा दृढनिश्चयानें हकालपट्टी केल्यावर कवीच्या हृदयांत शुद्ध प्रेमाचा, व्यापक प्रेमाचा, उदय झाला. प्रेमाचें उदात्तीकरण झालें; आणि 'पुनर्जात प्रेमास' आणि 'दिव्य प्रेमाची जाती' ह्या फारच सुंदर अशा दोन कविता लिहिल्या गेल्या. त्यांत वैयक्तिकतेच्या कोंडींतून सुटलेल्या कवीचा उत्कट आनंद पहिल्या कवितेंत, आणि उदात्त आणि निःस्वार्थी प्रेमाचें सुंदर वर्णन दुसऱ्या कवितेंत आहे. ह्या कविता वाचल्या की, शहरांतील भयंकर दाटी, धूळ, आणि कलकलाट यांतून शहराबाहेर सूर्यास्ताच्या रम्य आणि शान्त वेळीं मोकळ्या हवेंत आल्यासारखें वाटतें. 'दिव्य प्रेमाची जाती' ह्या कवितेइतकी गडकऱ्यांची अगदी निर्दोष, आणि व्यवस्थित लिहिलेली, कविता ह्या दीडशें कवितांच्या संग्रहांत दुसरी क्वचित्च सापडेल. (७) सातव्या वर्गांत 'प्रेमाचा प्रळयकाळ' ही एकच, ह्या दोहोंहूनहि फारच वरच्या दर्जाची असामान्य कविता येते. तिचा विचार त्यांच्या इतर असामान्य कवितांबरोबर मी ह्या भाषणाच्या शेवटीं करणार आहे.

ह्याप्रमाणे आपल्या एकंदर काव्यरचनेंत प्रत्यक्ष प्रेमविषयक कविता ३८ म्हणजे एकाच विषयावरच्या सर्वांत जास्त, हातून उतरल्यामुळेच बहुधा लोक गोविंदाग्रजांना 'प्रेमकवि' म्हणत असावे. पण असें ते कां म्हणतात हें मला कळत नाही. गोविंदाग्रज हे खरोखर प्रेमभंगाचे कवि आहेत; प्रेमाचे कवि नव्हत. अत्यंत शुद्ध, उदात्त, कोमल, पण अत्यंत तीव्र, अशा पतिपत्नी-प्रेमाची कविता वाचावयाची असेल,– तर रे. टिळकांचीच कविता, आणि त्यांतूनहि 'माझी भार्या' ही अप्रतिम कविताच वाचली पाहिजे, नाही तर भवभूतीचें 'उत्तररामचरित' वाचलें पाहिजे. ती तहान गडकऱ्यांची कविता वाचून, किंवा इतरत्रहि सहसा कोठेहि, भागणार नाही. आणि विविध प्रकारची, पण अश्लील नसून अस्सल आणि इरसाल शृंगारिक कविता आधुनिक कवीची वाचावयाची असेल, तर तांब्यांचीच कविता वाचली पाहिजे. तेथेहि गडकरी मागेच पडतात. गडकऱ्यांना फार तर 'विरहाचे कवि' म्हणावें. त्यांना 'प्रेमकवि' म्हणणें बरोबर वाटत नाही.

(आ) गोविंदाग्रजांचा दुसरा काव्य-प्रकार खिन्नता व्यक्त करणाऱ्या कवितांचा. त्यांत प्रेयसीचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष, असा कोणताच निर्देश नाही. पण खेदभाव तेवढा आहे; म्हणून त्या कवितांचा वेगळा वर्ग मी मानिला आहे. पण प्रेम-भंगामुळेच गोविंदाग्रजांच्या उपजत विनोदी आणि कोटिबाज स्वभावावर हीं खिन्नतेचीं अभ्रपटलें जन्मभर वावरत होतीं, हें सर्वश्रुतच आहे. ह्या प्रकारांत, 'एका जुन्या श्लोकाची आठवण,' 'अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेस,' 'एखाद्याचें नशीव,' 'ओसाड आडांतील एकच फूल,' 'जीवितास,' 'एक शंका,' आणि 'सुभाषित.' ह्या सात कविता येतात. ह्या वाचल्या म्हणजे मन खरोखरीच उदास होतें.

(इ) तिसरा प्रकार, स्त्रीविषयक असून अगदी शुद्ध भावनेच्या कवितांचा. ह्यांत गडकऱ्यांची 'गोड निराशा' ही एकच कविता पडते. कविता साधारण बरी आहे.

(ई) 'सांग कसे बसलों,' आणि 'प्रासंगिक किंवा अप्रासंगिकच,' ह्या दोन कविता, आणि 'स्मशानांतील गाणें,' 'अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेस', आणि 'घुंगुरवाळा,' ह्या तीन कवितांतील कांही कांही ओळी, अश्लील आहेत.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(उ) अश्लील नसलेल्या पण **उत्तान शृंगारिक** अशा गडकऱ्यांच्या 'गुलाबी कोडें', आणि 'पहिलें चुंबन' ह्या दोनच कविता आहेत. त्यांच्या शृंगारिक कविता इतक्याच.

(ऊ) कविता अगदी निराळीच असूनहि विरहदग्ध आणि स्त्रीचिंतन करणाऱ्या गोविंदाग्रजांच्या पहिल्या 'अरुण' कवितेच्या शेवटीं प्रेयसी, आणि 'गुलाबास' ह्या कवितेच्या शेवटीं स्त्री, ह्या उगाच असंबद्धपणे येऊन घुसल्या आहेत.

(ऋ) सातवा '**भक्तिपर**' हा कवितेचा प्रकार. ह्यांत गडकऱ्यांच्या 'अनामिकाचे अभंग', 'सगुण स्वरूप', आणि 'एकच मागणें' ह्या तीनच कविता पडतात. पैकी पहिलींत तिसरा अभंग फार सुंदर आहे. 'एकच मागणें' हीहि कविता चांगली आहे. गडकऱ्यांची श्री. शिवाजी महाराजांविषयींची उत्कट भक्ति 'पांच देवींचा पाळणा', आणि 'लोकमान्यांस भारतवर्षाचा आशीर्वाद' ह्या कवितेंत भवानी तरवार तेवढी विलायतेहून आणा, म्हणून सांगितलेला संदेश ह्यांच्या रूपानें, दिसून येते.

(ॠ) गडकऱ्यांच्या 'सुखदुःख', 'हुरहुर', 'कवि आणि कैदी', आणि 'फुटकी तपेली', ह्या चार शुद्ध **तत्वज्ञानात्मक कविता** असून, शिवाय 'केशवसुत मेले', या कवितेंत बऱ्याच अंशीं, आणि पहिला 'अरुण' या कवितेंत कांही जागीं, त्यांचे तत्वज्ञानात्मक विचार आले आहेत. पैकी 'फुटकी तपेली' ह्या कवितेचा निर्देश पुढे पुनः यावयाचाच आहे. त्यांच्या 'घुबडास' 'निद्रागीत', 'प्रेमाचा प्रळयकाळ', 'प्रेमपत्र', 'अपराध ह्यांत कोणाचा', 'शेवटचें प्रेमगीत', 'एकच मागणें,' इत्यादि अनेक कवितांत ब्रह्म, आत्मा, निःश्रेयस, पुनर्जन्म, कर्म, दैव, ईश्वरेच्छा, आणि ईश्वराचा न्यायीपणा, वगैरेंचा फार स्पष्ट आणि वारंवार निर्देश आलेला आहे. गडकरी अद्वैती होते, आणि इतकें मानसिक दुःख सोशीत असतांनाहि त्यांची ईश्वरावरची आणि त्याच्या न्यायीपणावरची श्रद्धा अढळ होती. हें उघड आहे. थोडेच दिवस ते नास्तिकपणाच्या वावटळींत सापडले होते. गडकऱ्यांच्या **चिंतनात्मक** अशा 'विचार' आणि 'मनांतील पाल' याच दोन कविता आहेत, आणि त्या फार, चांगल्या आहेत. गडकऱ्यांची सांस्कृतिक दृष्टि, 'कवीचा वधूवरांस अहेर', ह्या कवितेवरून स्पष्ट दिसून येतें, आणि त्यांची जगाकडे पाहण्याची दृष्टि आणि त्यांचें मनुष्यप्राण्याविषयींचें आणि जगाविषयींचें मत, 'आंधळ्यांची माळ', 'अल्लड प्रेमास', 'जीवितास', आणि, 'एक समस्या', ह्या चार कवितांवरून दिसून येते. गडकऱ्यांच्या गूढ कवितांविषयी मी येथे मुद्दाम कांही बोलत नाही. त्यांच्याविषयी शेवटीं जास्त सविस्तर विवेचन करावयाचें आहे.

(ए) 'निद्रागीत', 'घास', 'चिमुकलीच कविता', 'घुंगुरवाळा', 'कळ्यांचीं फुलें कशीं झालीं ?' 'वीर मरणाला शोभण्याजोगें गाणें' ह्या सहा, त्यांच्या बालक-बालिका-विषयक कविता आहेत. ह्यांतील 'कळ्यांचीं फुलें' ही कविता सोडली, तर बाकीच्या पांच कविता फार गोड आणि सुंदर आहेत. त्यांपैकी 'चिमुकलीच कविता' ही उत्प्रेक्षामय आणि सुंदर कविता असून 'वीरमरण' ही करुणमय आहे.

(ऐ) त्यांच्या चार **विनोदी** कवितांपैकी 'रांगोळी घातलेली पाहून' हींत मानवी स्वभावाची फार सुंदर बारीक छटा असून ही आणि 'हुकमे हुकूम' ह्या दोन कविता फार गमतीच्या साधल्या आहेत. 'काय करावें', हीहि चांगली आहे. 'विहिणींचा कलकलाट' ही मात्र कांही तितकी विशेष नाही. तींत अतिशयोक्तीचीहि अतिशयोक्ति झाल्यासारखें वाटतें आहे.

(ओ) 'देवल,' 'अभिनंदनपर वर्धापन,' 'केशवसुत मेले.' 'केशवसुतांची कविता वाचून,' 'गेले गोपाळकृष्ण,' 'नटमित्रास पत्र,' ह्या सहा, गडकऱ्यांच्या **व्यक्तींना उद्देशून** कविता आहेत. पैकी, 'अभिनंदन' हींत त्यांचा आपल्या कर्तबगार स्वजातीचा स्वाभाविक अभिमान दिसून आला आहे. केशवसुतांवरील कवितेचें विवेचन मघा होऊन गेलेंच आहे. बाकीच्यांत विशेष कांही नाही.

(औ) 'वेषभूषाकारास सादरार्पित पद्यभूषा,' ही कविता तात्यासाहेब कळकरांच्या 'वेषभूषा' ह्या कवितेला **स्तुतिपर उत्तर** म्हणून लिहिली आहे. एक कविता गडकऱ्यांनी, घाट्यांना उत्तर म्हणूनहि केली आहे. उत्तरादाखल अशा त्यांच्या ह्या दोनच कविता.

(अं) कोणीतरी मागणी केली, आणि तयार कविता तर जवळ शिल्लक नाही, अशा वेळींच गडकऱ्यांनी 'हुकमेहुकूम', 'कवितेसाठी धडपड', आणि 'ये, ये, ये, कविते' ह्या तीन कविता वेळेवर **ओढून ताणून केलेल्या** उघड दिसतात. पैकी 'हुकमेहुकूम' ही एकच चांगली जमली. बाकीच्या दोनमध्ये अनावश्यक आणि अव्यवस्थित रचनेचा भाग पुष्कळ असून त्यांच्यांत मौज आलेली नाही.

(अः) अहंकारी गडकऱ्यांनीहि आपला विनय 'फूल ना फुलाची पाकळी',

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आणि 'परमाणूंचें कार्यमाहात्म्य', ह्या अगदी शेवटल्यापैकी दोन कवितांत व्यक्त केला आहे.

(क) केशवसुतांच्या अनुकरणार्थ लिहिल्या नसूनसुद्धा 'घुवडास', 'प्रेमाखातर', आणि 'दुसरा अरुण' ह्या कवितांत मध्येमध्ये थेट केशवसुती वळणाचा भाग झाला आहे.

(ख) 'घरांत बसलेल्या काजव्यास', 'जगाचें गाणें' आणि 'लांडोर' ह्या गडकऱ्यांच्या तीन अन्योक्तिपर चांगल्या कविता आहेत.

(ग) 'घुबडास', या कवितेंत आपाततः दोन ठिकाणीं, आणि 'काव्याची व्याख्या' ह्याच नांवाच्या अपूर्ण कवितेंत, अशी तीन जागीं गडकऱ्यांची स्वतःची काव्याची कल्पना काय होती, ती ग्रथित झालेली आहे, आणि ती चांगली आहे.

(घ) 'पानपतचा फटका', ही अगदी प्रारंभींच्या काळांत लिहिलेली गडकऱ्यांची एकमात्र ऐतिहासिक कविता, त्यांचें देशप्रेम, इतिहासाभिमान, आणि पूर्वजांबद्दलचा आदर दर्शविते; पण ती प्रसिद्ध आहे, ती तिच्यांत पानपतचें युद्ध, आणि कॉंग्रेसची मिळमिळीत बैठक, ह्यांच्यांत सादृश्य दाखविण्याच्या हास्यास्पद अनौचित्याकरितां! कविता बरी आहे; पण तिच्यांत विशेष कोणताच रस साधला नाही.

(ङ) 'ओसाड आडांतील एकच फूल,' 'फणसाचें पान' 'भयाण झोकोत," आणि "गोफ" ह्या चारच कवितांत फक्त गडकऱ्यांचे सुभाषितवजा कांही थोडे चरण आले आहेत. तेव्हा, सुभाषितें गडकऱ्यांत फारच कमी, असें म्हणण्यास हरकत नाही.

(च) 'गुलाबास,' आणि 'एकच मागणें,' ह्या मिश्र कविता असल्यामुळे कोणत्याहि एकाच वर्गांत घालतां येत नाहीत. कांही कांही कवितांत वेगवेगळ्या दृष्टीनें वेगवेगळ्या गोष्टी सांगण्याजोग्या असल्यामुळे, त्यांचा निर्देश अनेक सदरांखाली आला. पहिल्या प्रास्ताविक भागांत वेगळाल्या विधानांचीं उदाहरणें म्हणून ज्या प्रकारच्या कवितांचा निर्देश एकदा होऊन गेला, त्यांचे ते ते वर्ग आणि त्या कविता पुन्हा येथे सांगितल्या नाहीत. आतापर्यंत ज्यांचा निर्देशच आला नाही, आणि ज्यांच्यांत निर्देश करण्याजोगें कांही नाहीहि अशा अगदी सामान्य प्रतीच्या अशा गडकऱ्यांच्या मला एकतीस कविता आढळल्या. त्यांचीं नांवें सांगून आपला व्यर्थ वेळ न घेतां त्यांचे पुस्तकांतील फक्त क्रमांकच देणें बरें:—१, २, ३, ५, ६, ९, ५१, ५३, ६६, ७०, ७५, ७८, ९१, ९२, ९३, ९४, ९५, ९६, ९७, १०२, १०३, ११०, ११५, १२०, १२२, १२७, १३२, १३५, १३६. १३८, आणि १३९. गडकऱ्यांच्या १५ कविता अपूर्णच आहेत. त्या बहुतांशीं सोडूनच देणें भाग आहे, त्यांचे क्रमांकः—१०५, ११६, ११७, १२०, १२१, १२३, १२५, १२६, १२८, १३०, १३२, १३४, १३६, १३८, आणि १३९. मला 'वेडा' ही गडकऱ्यांची सर्वांत जास्त सदोष आणि टाकाऊ कविता वाटते,

ह्याप्रमाणे एकोणवीस सदरांखाली 'वाग्वैजयंती'तील कवितांची पाहणी करून, विसाव्या (च) ह्या सदरांत उरलें सुरलें आवश्यक तेंसांगून झाल्यावर आतां—

(छ) ह्या एकविसाव्या कलमांत मी गडकऱ्यांच्या गूढ कवितां कडे वळतों.

ह्या गूढ कविता अगदी शेवटीं विचाराकरितां घेतल्या, कारण, ह्यांतच गोविंदाग्रजांच्या उत्क्रांतीचा अथवा त्यांच्या अनुभवाचा, आणि काव्यशक्तीचा, परमोच्च बिंदू काय होता, हें आढळून येतें. जेथे ह्या दोहोंचा परमोच्च बिंदु एकत्र येईल, तेंच ह्या कवीचें सर्वश्रेष्ठ काव्य.

मनुष्याप्रमाणेच काव्यकृतीला आणि कलाकृतीला आत्मा, मन, आणि शरीर हीं तिन्ही असतात. त्या कृतीचा विषय किंवा तिच्यांतील मूलभूत कल्पना हा तिचा आत्मा. त्या विषयाला अनेक मानसिक वेष देणें शक्य असतांना त्यांपैकी निवडून जो मानसिक वेष कवीनें किंवा कलाकारानें त्या कृतीला दिला असेल, तें त्या कृतीचें मन. आणि कवितेच्या बाबतींत शब्द आणि वृत्त; ललित कलांच्या आणि बाबतींत जीं चांगलीं, मध्यम किंवा वाईट ऐहिक साधनें कमी अधिक कौशल्यानें त्या विषयाच्या अभिव्यक्तीकरिता त्या कवीनें किंवा कलाकारानें वापरलीं असतील, तें त्या कृतीचें शरीर. मनुष्याप्रमाणेच काव्यकृतींत किंवा कलाकृतींतहि आत्मा, मन आणि शरीर ह्यांचा महत्त्वक्रम उत्तरोत्तर उतरता आहे. त्या कृतींत कांही हीन असेलच, तर तें ह्यापैकी जितकें खालचें हीन असेल, तितकें तें सह्य. जितकें वरचें हीन असेल तितकें तें असह्य. अर्थात् तिन्ही जेथे उत्तम असतील तीच कृति सर्वोत्तम. हा विषय जितका महत्वाचा तितकाच रम्यहि आहे. तो अधिक स्पष्ट होण्याकरितां अधिक विस्तारानें सांगणें आवश्यक आहे. पण तसें करण्याला

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आपल्याला वेळ नसल्याने, अनन्यगतिक होऊन, येवढेंच सूत्ररूपाने येथे सांगून पुढे जाणें भाग आहे.

'कसें' सांगितलें या विचाराबरोबर, इतकेंच नव्हे, तर त्याच्याहि आधी, 'काय' सांगितलें याचाहि विचार झालाच पाहिजे, आणि या विचाराला अधिक महत्त्व आहे, असें माझें म्हणणें आहे.

कवि आपले काव्यविषय हे आपल्या आत्म्याच्या उत्क्रांतींतील पायरीप्रमाणे निवडीत असतो. आणि ते विषय कवितेंत कसे रंगवावयाचे हें त्याच्या काव्यशक्तीच्या उन्नतीच्या पायरीवर अवलंबून असतें. येथे हें लक्षांत ठेविलें पाहिजे की, आत्मा ह्या नात्याने कवीची स्वतःची उन्नति निराळी, आणि त्याच्या काव्यशक्तीची उन्नति निराळी. आत्मोन्नति फार झाली आहे, पण काव्यशक्तीची उन्नति फार झालेली नाही, अशा कवीचें उदाहरण सावंतवाडीचे संत सोहिरोबानाथ हें देतां येईल. काव्यशक्तीची उन्नति पुष्कळ आहे, पण आत्म्याची उन्नति फार झालेली नाही, ह्याचें उदाहरण रामजोशी किंवा बायरन् हें सांगतां येईल. दोन्ही ज्यांचे परमोच्च बिंदूला पोचले आहेत असे ज्ञानेश्वरांसारखे महाकवि जगांत फार विरळा. जगद्विख्यात कवि रवीन्द्रनाथ ठाकुर यांना नोबेल प्राईज मिळालें तें या दोन दुर्मिळ गुणांच्या एकत्रीकरणामुळे. हीं अपवादात्मक उदाहरणें सोडलीं तरी इतर सर्व कवींचीहि पारख ह्याच कसोटीने केली पाहिजे. उत्क्रान्तींत पुढे जात चाललेल्या माणसाला येणारे हे सूक्ष्म, किंवा आन्तरिक, किंवा आध्यात्मिक अनुभव शब्दांनी सांगतां येत नाहीत. पण जें शब्दांत मावत नाही, जें शब्दांत वसत नाही, जें शब्दांनी सांगतां येत नाही, तेंच अचूकपणे शब्दांनीच दिग्दर्शित करणें, ह्यांतच कवीची खरी कर्तबगारी आणि शहामत आहे. कारण हीच त्याच्या काव्यशक्तीची अखेरची कसोटी आहे. ह्यांत जो जितका यशस्वी होईल तितका तो मोठा कवि. लोकमान्य टिळक गणिती आणि राजकारणी; पण त्या सर्वगामी बुद्धीच्या महापुरुषानेहि उच्चतम काव्याचें हेंच लक्षण माझ्याशीं बोलतांना मला एकदा सांगितलें होतें. शेक्स्पियरहि थोर काव्याविषयी 'Gives to airy nothings a habitation and a name' (अमूर्ताला तें नांवगाव देतें) असेंच म्हणतो. स्वतः गडकरीहि 'घुबडास' ह्या कवितेंत त्या घुबडाला प्रोत्साहन देतांना म्हणतात, "काळोखाचें (अज्ञानाचें) फोडुनि भिंग। अज्ञेयाचें उकली बिंग।". येथे 'बिंग' हा शब्द चांगला नसला, तरी त्या दोन चरणांत उत्तम काव्याची व्याख्या मी म्हणतों तीच व्यक्त झाली आहे. कारण, ही श्रेष्ठ काव्याची विवेकी जगांतील सर्वमान्य व्याख्याच आहे.

ह्याच जागीं मग खरें गूढ काव्य निर्माण होतें. गूढ काव्य किंवा गूढगुंजन हा कवीने केलेला 'शब्दवेध' आहे. येथे सावज डोळ्यांना दिसत नसतें. त्याची फक्त चाहूल घेऊन बरोबर नेम मारावयाचा असतो. कारण, शब्दांच्या हातांत न सापडणारा अनुभवाचा पारा, आणि सूक्ष्म वृत्तीचा वारा, हा शब्दांच्याच द्वारा शक्य तितका जास्ती आणि बरोबर पकडावयाचा असतो. म्हणून अशा जागीं विलक्षण किंवा विरोधाभासात्मक शब्दप्रयोग, विलक्षण कल्पना, आणि आश्चर्यकारक वर्णनें येतात; आणि गुणवंत हनुमंत देशपांडे हे आजच्या महाराष्ट्रांतील एक असामान्य थोर कवि 'वाऱ्याचेमारे' बांधावयाला लागतात. पण सामान्य लोक मात्र त्यांचा 'कोणता मानूं चंद्रमा'च डोक्यावर घेऊन नाचतात? उपनिषदांचे कांही भाग, श्रीमद् भगवद्गीतेचा कांही भाग, किंवा आपलीं सर्व पुराणें, हीं ज्या कारणाकरितां गूढ किंवा रूपकात्मक पद्धतीने लिहिलेलीं आहेत, त्याच कारणाकरिता अशा कविताहि केव्हा केव्हा गूढ लिहिल्या जातात. हीं कारणें दोन. एक हें की ह्या गोष्टी इतक्या पवित्र आहेत की, ह्या कांही, बिडीच्या जाहिरातीप्रमाणे रस्त्यावर पोंग्यांतून ओरडून सांगावयाच्या नसतात. म्हणून, त्या ज्यांना कळाव्या अशी इच्छा असते त्यांना तर कळाव्या, पण ज्यांच्या कानांवर त्या जाणें व्यर्थ आहे, किंबहुना ऐकणारा आणि सांगणारा ह्या दोघांनाहि कदाचित् हानिकारकहि ठरण्याचा संभव आहे, त्या गोष्टी गूढ पद्धतीने किंवा रूपकांनीच सांगणें इष्ट आहे. दुसरें कारण असें कीं, अशा रीतीने हे आन्तरिक अनुभव सांगितले, तरी ज्याच्या ते परिचयाचे आहेत, त्याला ते वाचल्याबरोबर कळतात; आणि त्याला तें लेखन फारच सुंदर आणि बिनमोल वाटतें. आणि ज्यांना ते अनुभव नसतात त्यांना तें सर्व अर्थविहीन गौडबंगाल वाटतें; आणि ते त्याचा नाद सोडतात; आणि तेंच प्रस्तुत जागीं इष्ट असतें. म्हणजे हें लेखन असें गूढ लिहिल्याने समाजाला त्याचा जो, मार्गदर्शनाचा, धीर देण्याचा, वगैरे उपयोग व्हावयाला पाहिजे तोहि होतो. आणि हानिहि टळते. पण ज्यांना असें लेखन कळत नाही त्यांपैकी कांही लोक आपलें अज्ञान कबूल करण्याऐ

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तयार नसतात. आणि म्हणून, हें लेखन अर्थविहीनच आहे म्हणून आग्रहाने शेरा मारून तरी ते मोकळे होतात, नाहीतर त्या लेखनाचे भलभलते अर्थ लावण्याचा प्रयत्न करून, तेहि अर्थ ह्या लेखनावर नीट बसत नाहीत असें पाहून चिडून जाऊन त्या लेखनावर आणि त्या लेखकावर आग पाखडतात.

हीच स्थिति, 'गोविंदाग्रज' हें बाकी सर्व दृष्टींनी सुंदर पुस्तक लिहिणाऱ्या श्री. रा. ग. हर्ष्यांची झाली आहे हें पाहून आश्चर्य वाटतें. अशा लोकांनी खरोखरी, गडकऱ्यांसारख्यांचें तें लेखन असतांना, 'मला हें लेखन कळत नाही', एवढेंच म्हणावयास पाहिजे; आणि तसें बहुतांशीं श्री. वि. स. खांडेकर, श्री. श्री. म. माटे, प्रा. दत्तात्रय लक्ष्मण गोखले, वगैरे लेखकांनी केलेलेंहि आहे. कारण, याहि सर्वांना गोविंदाग्रजांच्या ह्या गूढगुंजनात्मक कवितांचें कोडेंच पडलें आहे. ह्या कवितांचा अगदी मोघाच, पण निदान सरळ असा अर्थ कोणी लावलाच असेल, तर तो माडखोलकरांनी आपल्या 'कविपंचकांत', आणि प्राध्यापक गोखल्यांनी 'काव्यचर्चे'तील आपल्या लेखांतच, लावला आहे, पण त्याहि अर्थांत ह्या कवितांची आध्यात्मिक अनुभवाची बाजू आलेली नाहीच. पण हर्ष्यांनी मात्र जीभ टाळूला लावून ह्या कवितांची निंदा केली आहे आणि स्वतः गडकऱ्यांवरहि तोंड टाकण्याला कमी केलेलें नाही. ते त्यांचे सर्व अपशब्द आपल्याला येथे सांगून मी आपला वेळ घेत नाही. त्यांचीं कळसाचीं दोनच वाक्यें फक्त सांगतों. ते आपल्याला 'गोविंदाग्रज' ह्या पुस्तकांत शके १८५० च्या आवृत्तींत पान १०२ आणि १०३ वर म्हणतात:—"गूढगुंजन हा काव्यदोष असण्यापेक्षा स्वभावदोषच (Constitutional defect) अधिक आहे. अत्युक्तीचा आश्रय करून असें म्हणतां येईल की, गूढगुंजनवाल्यांच्या मेन्दूतच कांही तरी बिघाड झालेला असतो ? ' इ० स० १९०८ सालीं शिक्षा देतांना दावरलाहि लोकमान्य टिळकांच्या मेंदूत बिघाडच दिसला होता ? पण अशा शिव्या दिल्याने दावराचे 'लोकमान्य' बनले नाहीत, किंवा लोकमान्यांचा 'दावर' झाला नाही. दोघांचीहि किंमत जग जाणतें. हर्ष्यांच्या ह्या बेताल बडबडीला उत्तर हेंच की, हा निव्वळ अज्ञानजन्य अमर्यादपणा आहे. आपल्या ह्या बेफाम बडबडीचा शितोडा जुन्या संतांवरहि उडणार, कारण, त्यांनीही गूढ काव्यरचना केली आहे, हें बडबडतां बडबडतां लक्षांत आल्याबरोबर, हर्ष्यांनी ज्ञानेश्वर ते तुकाराम ह्या संतांचा त्याला झट्कन् अपवाद करून टाकला ? पण तुकारामानंतर आता ह्यापुढे मी कोणत्याहि मानवदेहधारी कीटकाला कोणताहि आध्यात्मिक अनुभव देण्याची चूक पुनः करणार नाही असें अगदी आपल्या कानाला खडा लावून ब्रह्मदेवाने रा. ग. हर्षे ह्यांना कोणत्या दिवशीं, किती वाजतां, आणि कोणाला साक्ष ठेवून अभिवचन दिलें, हें मात्र हर्षे आपल्या पुस्तकांत नमूद करून ठेवावयाला विसरले, ही त्यांची मोठीच चूक झाली. श्री. रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ, आणि शेंकडो इतर संत आणि थोर अनुभवी पुरुष तुकाराममहाराजांच्या पूर्वी झाले की नंतर ? आणि अशा संतांखेरीज इतरांना असे कोणतेहि अनुभव येत नाहीत असेंच म्हणणें असेल, तर सर फ्रान्सिस यंगहसबंड ह्यांनी आपल्या हिमालयांतील प्रवास-वर्णनाच्या प्रारंभींच आपल्याला एक दिव्य अनुभव आल्याचें जाहीर रीतीने लिहून ठेवलें आहे, तें वाचावें. मिस् मेरी कॉरेलीने आपल्या "A Romance of the two worlds" ह्या कादंबरींत अशा एका अनुभवाचें वर्णन करून ठेविलें आहे. मिसेस् एव्हेलिन् अंडरहिल् बाईने "Mysticism" ह्या आपल्या पुस्तकांत अशा अनेक सामान्य साधकांच्या अनुभवाच्या गोष्टी नांवागावासकट दिल्या आहेत. ह्या बाईनी ह्याच विषयाशीं संबद्ध असलेल्या विषयांवर सहा पुस्तकें अशाच माहितीने भरलेलीं लिहिलीं आहेत. मी हे सर्व पुरावे मुद्दाम यूरोपियनच घेतले आहेत. आपल्याकडील मोठें उदाहरण पाहिजे असेल, तर महाकवि बाबू रवीन्द्रनाथ ठाकुरांनी आपल्या "My Reminiscences" ह्या पुस्तकांत आपल्याला कांही काळ एक दिव्य दृष्टि प्राप्त झाल्याचें वर्णन स्पष्टपणें लिहून ठेविलें आहे, तें वाचावें. अशीं कितीतरी उदाहरणें देतां येतील. असे अनुभव आलेलीं माणसें मीहि प्रत्यक्ष पाहिलेलीं आहेत. म्हणून, गडकरी हे संत नसले, तरी त्यांना कोणताच आध्यात्मिक अनुभव येणें अशक्य आहे, असें मुळीच नाही. आणि अशाच एका आन्तरिक उच्च अनुभवाचें गडकऱ्यांनी आपल्या गूढ कवितांत खंडशः वर्णन करून ठेवलेलें आहे.

ह्या अनुभवाचें स्वरूप असें आहे. मनुष्याच्या अंतरंगांत एक अवर्णनीय अशी दैवी शान्ति कांही काळ मनुष्याच्या अनुभवाला येते. कोणत्याहि व्यावहारिक किंवा ऐहिक सुखाच्या, समाधानाच्या, किंवा तथाकथित आनंदाच्या उपमेनें त्या शान्तीची कल्पना देणें अशक्य आहे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हिच्यांत आनंद असतो, पण तो क्षणिक अशा व्यावहारिक आनंदासारखा उथळ आणि आणि तात्पुरता नसून रात्रंदिवस अखंड राहणारा, अति गंभीर, अति खोल, प्पण तितकाच उत्कट आणि विशाल, असा असतो. ह्या अनुभवाच्या वेळीं आपल्या चैतन्याचा आणि जाणीवेचा अतिशय विस्तार झाल्याचें माणसाला आढळून येतें. आणि हा आनंद इतका उत्कट आणि विशाल असला तरी उच्छृंखल नसल्यामुळे त्याच्याच बरोबर हृदयांत असणारी अथाक शान्तिहि पण अक्षरशः समुद्राप्रमाणे हृदयांत अखंड आणि गंभीरपणे नांदत असते. शान्ति म्हटली की निष्क्रियतेची, गुपचुप राहण्याची, चलन-वलन-हीनतेची एक स्थिति; आणि आनंद म्हटला की एक उसळण्याची, उचंबळण्याची मानसिक क्रिया; अशा आपल्या मनांत, व्यवहारांत त्या शब्दांचा उपयोग केला म्हणजे परस्परविरोधी कल्पना उभ्या राहतात. पण ती तेथील 'शान्ति' आणि तेथील 'आनंद' हे एकच आहेत. दोन नाहीतच. ती शान्ति म्हणजे निष्क्रियता, चलनवलनहीनता, नाहीच. ती 'उचंबळणारी शान्ति' आहे. इतकेंच नव्हे, तर ऐहिक सुखदुःखांच्या, आणि दुःखाच्यासुद्धा;--हें मुद्दाम सांगतों, प्रसंगीं ह्या शान्तींत प्रचंड वादळें--शान्तीचींच वादळें-- निर्माण होतात. 'यस्मिन् स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते" अशी खरोखरीच ती स्थिति असते. त्या शान्तीचीं वादळें म्हणजेच तेथील 'आनंद'; आणि त्या आनंदाची आत्मप्रतीतीची अवस्था म्हणजेच तेथील 'शान्ति'. 'उचंबळणारी शांति', 'शान्तीचीं वादळें' हे शब्दप्रयोग कितीहि विसंगत किंवा चमत्कारिक वाटोत. पण त्या अनुभवाचें हेंच खरें आणि बरोबर वर्णन आहे. 'इथें वाणिची दीनता सिद्ध होते.' आणि 'आनंद' आणि 'शान्ति' ह्या दोन वृत्तींच्या बरोबरच अत्यंत शुद्ध, पूर्ण निस्वार्थी, अतिशय उच्च, आणि तितकेंच उत्कट, असें विश्वव्यापी, सर्वात्मक प्रेम हेंहि ह्या अनुभवांत त्या 'शान्ती'शीं आणि 'आनंदा'शीं सर्वस्वी एकरूप होऊनच असते. तेथील आनंदाचीं वादळें म्हणजे ह्या प्रेमाचींच वादळें, आणि तेथील आत्माभिमुख आनंदाला येणारा 'शान्ती'चा अनुभव म्हणजे ह्या अगाध प्रेमसागराच्या अथाक खोलीचा साक्षात्कार. तेथे प्रेम हीहि वृत्ति आनंद आणि शान्ति ह्याहून भिन्न नाहीच. त्या अनुभवांत मनुष्याचें चित्तैकाग्र्य आणि ज्ञानशक्ति अत्यंत तीव्र होऊन, कोणताहि प्रश्न समोर येतांच, जळत्या वाळलेल्या पाचोळ्यासारखा भस्म होतो. आणि आत्मसंयम ही श्रमाची बाब न उरतां ती स्वाभाविक वृत्तीच बनते. ह्या अनुभवाच्या वृत्तींत 'ईश्वर आला करी गमे'. कारण, हा दैवी साक्षात्काराचा अनुभवच आहे. हें या अनुभवाचें पहिलें अंग झालें. अनुभव पुढे एका काळीं जरी शाश्वत स्वरूपांत स्थिर होणारा असला तरी आत्माभिमुख भक्तजीवाला जेव्हा प्रारंभीं हा अनुभव येतो, तेव्हा तो एकदम कायम टिकत नाही. येतो आणि जातो, असें अनेक जन्म अनेकवार होत असलें पाहिजे. मग तो अखेर स्थिर होणार. हा दर जन्मीं येणारा अधिकाधिक उत्कट अनुभव हा भक्त साधकाला पुढे पुढे नेण्याकरिता, त्याला शाश्वत शांतीचा अति कठीण प्रयत्न करण्याला सतत उद्युक्त करण्याकरिता आणि प्रोत्साहन देण्याकरिता, त्याचा थकवा घालवून त्याला धीर देण्याकरिता असतो. म्हणून प्रारंभींच्या अवस्थेंत तो जातोच. तो गेला म्हणजे हृदयांत जी पोकळी उत्पन्न होते, हृदयांत जें शून्य होतें, जी भयंकर खिन्नतेची स्थिति उत्पन्न होते जी जळती तळमळ जाळूं लागते, जो असमाधानाचा आणि बेचैनीचा डोंब उठतो, त्या वृत्तीलाहि जगतांत नांव नाही. व्यवहारांतल्या कोणत्याहि दुःखानें त्या दुःखाची बरोबरी होणार नाही. त्या दुःखासारखें दुसरें दुःख नाही आणि इतक्या उत्कट शांतीनंतर पाठोपाठ एकदम ही वृत्ति आल्यामुळे तर विरोधामुळे तिची भयानकता केवळ असह्य होते. ह्यावेळीं मनुष्य वेडा झाल्यासारखा होतो. अरविंद बाबू, आपल्या पत्नीला लिहिलेल्या एका पत्रांत अशा अर्थाचे उद्गार काढतात की, I hope you have by now realised that you are married to a madman (तुझें लग्न एका वेडप्याशीं झालेलें आहे, हें मला वाटतें, आतापर्यंत तुझ्या लक्ष्यांत आलेंच असेल.) ह्या स्थितींत मनुष्याने आत्महत्यासुद्धा करणें अशक्य नाही, इतकी ती दुःखदायक आहे. पाश्चात्य देशांतील अनेक भक्तसाधकांना आलेल्या ह्या वृत्तीचीं वर्णनें देऊन मिसेस् एव्हेलिन् अंडरहिल् बाईने ह्या स्थितीला, "The Night of the Soul" (जीवाची काळोखी रात्र) असें नांव दिलें आहे. हें नांवहि जुनेंच आहे. त्या बाईने निर्माण केलेलें नाही. थिऑसॉफी वाङ्मयांत ह्याच स्थितीला कदाचित् 'अवीचि'-हि म्हणतां येईल. 'विराणीचे अभंग' तोंडून निघण्याची हीच स्थिति असावी. ह्या स्थितींत हृदयांतून जें नाहीसें होतें, तें भावनेच्या जळफळाटामुळे डोक्यांतूनहि

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाहीसें होतें. सर्वत्र अश्रद्धा उत्पन्न होते. मनुष्याला ईश्वराच्या अस्तित्वाचासुद्धा संशय येऊं लागतो. पण हृदयाला, 'मी तर अमुक अमुक अशी अशी दिव्य शांति पूर्वी अनुभवलेली आहे' ह्याची पक्की जाणीव असते. पण, वऱ्हाड–नागपुरांत ऐन वैशाखाच्या दोन प्रहरीं, 'मी गतवर्षी काश्मीरांत गेलों होतों,' ह्या तळमळीच्या आठवणीनेहि जितका खराखुरा गारवा प्रत्ययाला येईल, तितकेंच समाधान ह्या शांतीच्या आठवणीने ह्या वेळीं मनाचें होतें. इतकेंच नव्हे, तर त्या असमाधानाच्या आगींत ह्या आठवणीने तेलच ओतलें जातें आणि हृदय एकीकडे आणि मन दुसरीकडे, अशी स्थिति होते. आणि मनुष्य अति विचार करून करून थकून जातो. आणि ज्याच्यावर विश्वास आहे किंवा नाही ह्याचीच शंका आहे, त्या ईश्वरालाच 'मला कांहीतरी प्रत्यंतर किंवा प्रत्युत्तर दे' म्हणुन कळवळून आणि किंचाळून हाका मारूं लागतो. ह्या आध्यात्मिक अनुभवांतील ही दुसरी अवस्था, पायरी किंवा हें त्या संपूर्ण अनुभवाचें दुसरें अंग आहे. ह्या दुसऱ्या अंगालाहि कांहीच नांवच नसल्यामुळे आपण 'अशांति' हें तात्पुरतें आपल्या सोयीसाठी नांव ठरवून घेऊं. ह्यानंतरची ह्या अनुभवाची तिसरी आणि शेवटली अवस्था, किंवा त्याचें अंग, म्हणजे ह्याच जन्मीं किंवा पुढल्या जन्मीं त्या भक्तजीवाला त्या शांतीचा पूर्वीपेक्षाहि उत्कट असा चढत्या क्रमाने अनुभव येत जाणें, ही आहे.

मी कलकत्त्याला कॉलेजांत शिकत असतांना महायोगी बाबू अरविंद घोष ह्यांचा आणि माझा दाट परिचय झाला. इतर अनेक गोष्टींबरोबर आम्ही आध्यात्मिक विषयांवरहि पुष्कळ बोललों. अर्थात् मी विचारणारा आणि ते सांगणारे असत. मी आता आपल्याला वर्णन करून सांगितला, हा संपूर्ण आध्यात्मिक अनुभव आपल्याला स्वतःला येऊन गेला असल्याचें बाबूसाहेबांनी मला आपल्या मुखाने सांगितलें आहे. आणखीहि कांही गोष्टी त्यांनी सांगितल्या पण त्यांचा येथे संबंध नाही.

ह्या अनुभवाचें गडकऱ्यांनी आपल्या 'कलगी', 'मुरली', आणि 'प्रेमाचा प्रळयकाळ' ह्या तीन कवितांत वर्णन केलेलें आहे. ह्याचा अर्थ असा नव्हे की, हा अनुभव येण्याला मनुष्य अरविंदबाबूंच्या इतकाच मोठा पाहिजे. 'अनेक तरुण मुलांना हा अनुभव येऊन गेल्याचें मला माहीत आहे,' असें अरविंदबाबूच माझ्याजवळ बोलले. मी ह्या अनुभवाविषयी बोलतों तें निव्वळ तर्काने किंवा पुस्तकें वाचून नव्हे. मला त्याची माहिती वयाच्या सुमारें अठराव्या वर्षापासून म्हणजे पंचेचाळीस वर्षांपूर्वीपासून आहे.

'कलगी', 'मुरली', आणि 'प्रेमाचा प्रळयकाळ' ह्याच गोविंदाग्रजांच्या फक्त तीन गूढगुंजनात्मक कविता. ज्याला अद्वैत तत्त्वज्ञानाची कांहीहि माहिती आहे असा कोणीहि मनुष्य 'फुटकी तपेली' ह्या कवितेचा गोविंदाग्रजांच्या गूढगुंजनात्मक कवितांत चुकूनसुद्धा अन्तर्भाव करणार नाही. कारण, त्या कवितेंत कांहीहि आन्तरिक अनुभव असा मुळीच सांगितलेला नाही. तींत साधें अद्वैत तत्त्वज्ञान फुटक्या तपेलीच्या रूपकाने समोर मांडलें आहे. त्यापेक्षा त्या कवितेंत कांही जास्त नाहीच. ती निव्वळ बुद्धिप्रधान कविता आहे, आणि बुद्धीने कळते. ती कळण्याला अनुभवाची गरज नाही. पण 'कलगी' 'मुरली,' आणि 'प्रेमाचा प्रळयकाळ', ह्या तीन कवितांत, आणि फक्त ह्या तीन कवितांतच, गोविंदाग्रजांनी वर्णन केलेला आध्यात्मिक अनुभव माहित असल्यावाचून त्या कविता कळत नाहीत. हा तात्त्विक आणि गूढगुंजनात्मक कवितांतील फरक येथे लक्षांत ठेवला पाहिजे. हा लक्षांत न आल्यामुळे ह्यांनी गोविंदाग्रजांच्या 'फुटकी तपेली' ह्या सरळ तात्त्विक कवितेचाहि, इतकेंच नव्हे, तर केवळ कांही अचाट कल्पना आणि अद्भुत वर्णनें आहेत म्हणूनच की काय, 'घुबडास' ह्या अगदी साध्या व्यावहारिक कवितेचा सुद्धा, गडकऱ्यांच्या गूढगुंजनात्मक कवितांत अन्तर्भाव करून टाकला आहे !! ह्याच्या उलट, श्री. वि. स. खांडेकरांनी 'फुटकी तपेली' ह्या कवितेबरोबरच 'कलगी,' 'मुरली,' आणि 'प्रेमाचा प्रळयकाळ' ह्याहि तिन्ही कवितांचा गोविंदाग्रजांच्या तात्त्विक कवितांत अन्तर्भाव करून टाकला आहे !! ह्या दोघांनीहि माझ्या मतें घोटाळा केला आहे. त्या कवितांचें माझें वर्गीकरण मीं आपल्याला आज सांगितलें असें आहे.

ह्या तीन कवितांपैकी 'प्रेमाचा प्रळयकाळ' ह्या कवितेंत गडकऱ्यांनी, मघा मीं वर्णन केलेल्या अनुभवांतील पहिल्या 'शान्ती'ला 'प्रेम' हें नांव देऊन त्या पहिल्या अवस्थेचें वर्णन केलें आहे. त्या पहिल्या 'शान्ती'ला प्रेम हेंहि नांव अगदी सहज आणि उचितत्वाने कसें देतां येईल हें मी थोड्या वेळापूर्वीच विशद करून सांगितलें आहे. म्हणून तिला 'प्रेम' नांव देण्यांत गडकऱ्यांनी चूक कांहीहि केली

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाही. त्या एकाच वृत्तीच्या भिन्न भिन्न स्वरूपांपैकी 'प्रेम' ह्या स्वरूपाला त्यांनी जास्त महत्व दिलें. किंवा त्यांना स्वतःला तोच त्यांतील भाव जास्त आवडला, येवढाच त्याचा अर्थ. आवडत्या लेकराला आईनें आणि बापानें आपलीं आपलीं वेगळीं वेगळीं आवडतीं नांवें ठेवावीं, त्यांतलाच हा प्रकार, दुसरें कांहींहि नाही. आणि 'प्रळयकाळ' त्यांतील 'प्रळय' हा शब्द ह्या जागीं वाईट अर्थानें मुळींच वापरलेला नाही. 'विश्व बुडे मम हृदयांत' हा त्या कवितेंतीलच चरण आहे. सारें विश्वच माझ्यांत येऊन समावलें, आणि मीच साऱ्या विश्वांत पसरलों आहें, म्हणजे मी विश्वात्मक झाल्यामुळे 'मी' आणि 'विश्व' भिन्न उरलों नाही, आणि 'बाह्य विश्व' म्हणून सर्व नष्टच झालें, ह्या अर्थानेंच फक्त 'प्रळय' शब्द गडकऱ्यांनी येथे वापरला आहे. आणि सहाव्या कडव्यांत, आणि दहाव्या कडव्याच्या उत्तरार्धापासून तों तेराव्य कडव्याच्या पूर्वार्धापर्यंत, आत्मा, ब्रह्मपद, ब्रह्मस्थिती, वगैरे शब्द स्पष्टपणें वापरून, मी 'अनंताच्या पलीकडल्या' अशा एका कशाचें तरी वर्णन करीत आहें, हें गडकऱ्यांनी दिवसाच्या प्रकाशाइतकें स्पष्टपणें दाखवून दिलें आणि प्रत्यक्ष सांगितलें असतांना, आणि वैयक्तिक प्रेमाच्या निर्देशाचा त्या सबंध कवितेंत कोठे लवलेशहि नसतां, ज्यांनी ही त्यांची कविता प्रेयसीच्या प्रेमभंगाकडे नेऊन लावली, त्यांची तारीफ करावी तेवढी थोडीच आहे.

'मुरली' ह्या कवितेंत, मी मघा सांगितलेल्या अनुभवापैकी दुसऱ्या, 'अशान्ती'च्या, अवस्थेंत मनुष्य ईश्वराला ज्या कळवळून हाका मारतो, त्याचें प्रथम वर्णन आहे; आणि मग मुरली ऐकूं आल्यावर होणारी स्थिति आणि होणारा आनंद, ह्यांचें वर्णन आहे. गडकऱ्यांनी ह्या कवितेच्या प्रस्तावनेंत अगदी स्पष्ट शब्दांत असें लिहून ठेवलें आहे:—"मनुष्याच्या आयुष्यांत असा एक काळ एकदा तरी येतोच की, ज्या ज्या वेळीं ईश्वराचें अस्तित्व **भावपूर्ण हृदयाला** पटतें आणि तेव्हा मात्र **बुद्धिप्रधान मस्तकाचें समाधान** करण्यासाठी तळमळणारा जीवात्मा ईश्वरी साक्षात्काराची–प्रत्युत्तराची–याचना करीत असतो... या गाण्यांत अशा ईश्वरी उत्तराला 'मुरलीध्वनि' कल्पून त्यासाठी झुरणाऱ्या राधेच्या पांच चढत्या स्थिती दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे." (येथील जाडीं अक्षरें मुळांतीलच जाडीं आहेत.) त्यापेक्षा जास्त स्पष्ट माणसानें कसें सांगावें? त्या गडकऱ्यांच्या वाक्यांत मी म्हणतों त्याच अनुभवाचें आणि स्थितीचें वर्णन आहे की नाही, हें ज्याचें त्यानें पाहून घ्यावें. पण ही कविता खऱ्या अर्थानें मुळीच न कळल्यामुळे हर्ष्यांनीं सोपा मार्ग काढला. त्यांनी गडकऱ्यांना खोटें बोलणारे ठरवून टाकलें. ह्या सबंध प्रस्तावनेवर पूर्ण अविश्वास व्यक्त केला. ही गडकऱ्यांनी मूळ राधाकृष्णांच्या प्रेम-वर्णनाकरितां कविता लिहिली असें ठरवून टाकलें! आणि "ह्या एकंदर कवितेवर," .... भक्त–ईश्वरांचें रूपक बसविण्याचा त्यांनी (गडकऱ्यांनी) निरर्थक प्रयत्न केला आहे," असा खुशाल शेरा मारून टाकला आहे! आणि मग आणखी असेच ह्या कवितेबद्दल अनेक तर्क वितर्क लढवून ह्या काव्याचा "पायाच मुळी कच्चा" आहे असा सिद्धान्त ठोकून दिला आहे! आणि 'मुरली' कवितेचा कोणीहि 'समाधानकारक आणि सुसंगत अर्थ लावून दाखवावा" असें जवळजवळ जाहीर आव्हानच दिलेलें आहे! इतकें विसंगत खरोखरी त्या कवितेंत कांहीच नाही. ह्या तिन्ही कवितांबद्दलच्या हर्ष्यांच्या सर्व विधानांना उत्तरें देण्याला आज आपल्याला अर्थात अवसर नाही. फक्त माझ्या मूलभूत कल्पना, हर्षे ह्यांचें मुख्य म्हणणें, आणि त्याविषयी माझ्या उत्तराचें ठोकळ स्वरूप, एवढेंच आज येथे सांगणें शक्य आहे.

'कलगी' ह्या कवितेंत प्रारंभीं जें ढोलनगाऱ्यांचें वगैरे वर्णन आहे, तें, 'अशांतीच्या' स्थितींतील अत्यंत त्रासदायक विचारांचें, आणि हृदय जाळीत आहेत, असें वाटावें, अशा तीव्र भावनांचें, वर्णन आहे. ह्या गाण्यांतील 'सारंगी' म्हणजें पूर्वी अनुभवलेली पहिल्या अवस्थेंतील शांति. डोंगरावरील बाळ म्हणजे आत्मा. वृद्ध वधूचें बालवराशीं लग्न म्हणजे आत्म्याची आणि ईश्वराची भेट. हर्षे म्हणतात त्याप्रमाणे, माया आणि ब्रह्म ह्यांचें लग्न नव्हे. तसेंच, हर्षे म्हणतात त्याप्रमाणे, केशवसुतांच्या 'सतारीचे बोल,' ह्या कवितेवरून ही कविता केलेलीहि नाही, आणि सुचलेलीहि नाही. त्या कवितेचा आणि ह्या कवितेचा कांहींहि अर्थाअर्थी संबंध नाही. ह्या दोन्ही कवितांचें वृत्त आपाततः एकच घेतलें गेलें आहे, एवढेंच फक्त त्यांत साम्य आहे. ह्या दोन्ही कवितांचे विषयच जमीन–अस्मानाइतके भिन्न आहेत. तसेंच, हर्षे म्हणतात त्याप्रमाणे 'कलगी' आणि 'घुवडास', ह्या कवितांतहि मुळीच साम्य नाही. 'कलगी'त निरर्थक कल्पनातरंग नाहीत. हर्षे यांच्या आक्षेपांचीं उत्तरें द्यावीत तितकीं थोडींच आहेत. ह्या सर्व गोंधळाचें मूळ कारण एकच

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आहे की ह्या तिन्ही कवितांच्या मूळ कल्पनेचेंच हर्षे ह्यांना आकलन झालें नाही. 'कलगी' आणि 'मुरली' ह्या कविता बाह्यतः कितीहि भिन्न दिसल्या, तरी त्यांचा मूळ अंतस्थ विषय बराचसा एक आहे. त्यांची मांडणी भिन्न आहे. 'मुरली'ला सुरवात प्रत्युत्तर मागण्यापासून आहे. त्याच्या पूर्वीच्या सर्व अवस्था तींत गाळून टाकल्या आहेत. 'कलगीं'त त्या सांगितल्या आहेत. 'मी पूर्वी सारंगी ऐकली आणि ती मला फार आवडली होती,' असें 'कलगीं'त पहिल्याच कडव्यांत स्पष्ट म्हटलें आहे. हें त्या अनुभवांतील पहिल्या शांतीचें वर्णन आहे. म्हणजे, 'प्रेमाचा प्रळयकाळ' ह्या कवितेंतील 'प्रेमाचा प्रळय,' म्हणजे **'प्रेमाचा झालेला प्रळय'** नव्हे. **'प्रेमानें केलेला प्रळय'** म्हणजे 'विश्वाचा ग्रास', म्हटलें आहे, त्याला कारणीभूत झालेलें जें 'प्रेम' ऊर्फ 'शान्ति' त्यालाच 'मुरलीं'त 'मुरलीध्वनि' म्हटलें आहे, आणि त्यालाच 'कलगीं'त 'सारंगी' म्हटलें आहे. 'प्रेमाचा प्रळयकाळ' ह्या कवितेंत त्या अनुभवाच्या प्रारंभींच्या शांतीच्या एकाच अवस्थेचें वर्णन करून ती कविता पूर्ण करून टाकली. 'मुरलीं'त ही पहिली अवस्था गाळून टाकून आणि मधला 'अशांतीं'तील भयानक जळफळाटहि गाळून टाकून, ईश्वराला हाका मारण्याच्या अवस्थेपासून त्या कवितेला प्रारंभ केला, आणि पुढला, ब्रह्मैक्यापर्यंत, अद्वैतापर्यंत, सगळा भाग सांगून टाकला. 'कलगीं'त 'मुरली' कवितेच्या मागे हटून प्रारंभापासून हा सर्व अनुभव सांगून टाकला. पण पहिल्या अवस्थेचें वर्णन 'प्रेमाचा प्रलयकाळ' ह्या कवितेंत असल्यामुळे पहिल्या कडव्यांत फक्त 'मी पूर्वी सारंगी ऐकली होती, आणि ती मला फार आवडली' एवढाच चुटपुटता निर्देश अवघ्या एका कडव्यांत करून, गडकऱ्यांनी, आतापर्यंत कधीहि कोठे न केलेल्या दुसऱ्या, 'अशांति'च्या, ढोलनगाऱ्यांच्या, घोर अवस्थेचें वर्णन मात्र सविस्तर केलें, आणि 'मुरली'तीलच पुढला, शेवटला अनुभव 'कलगीं'त 'गाणें' ह्या नांवाखाली पुनः निराळ्या शब्दांत वर्णन केला. कारण त्यावाचून मागल्या घोर आणि भयानक अवस्थेच्या अत्यंत दुःखद वर्णनाचें पूर्ण परिमार्जन झालें नसतें; हा अनुभव येथेंच संपला की काय, असें वाटलें असतें, कवितेची तोंडमिळवणी झाली नसती; आणि अनुभव पूर्ण सांगून झाला नसता. ह्याचा अर्थ हा की, 'प्रेमाचा प्रलयकाळ', आणि 'मुरली' ह्या दोन्ही कविता त्या अनुभवाचें अंशतः वर्णन करणाऱ्या आहेत. त्या संपूर्ण अनुभवाचें वर्णन करणारी गडकऱ्यांची 'कलगी' हीच एक कविता आहे. म्हणूनच त्यांना तिच्याविषयी कांही तरी फार वेगळें वाटत होतें, हें त्या कवितेच्या अखेरअखेरच्या कडव्यांवरून अगदी स्पष्टपणे दिसतें. कोणत्याहि कवितेंत गडकऱ्यांनी, 'माझ्या ह्या कवितेला कोणीतरी उत्तर द्या', म्हणून कधीहि मागणी केली नाही. पण ह्या कवितेंत त्यांनी ती केली; आणि एक वेळ नाही, तर खुद्द कवितेंत दोनतीनदा आणि शेवटल्या गद्य टीपेंत पुनः एकदा, अशी तीन चार वेळां केली !. आणि, कवितेच्या शेवटीं गद्य टीप अशी गडकऱ्यांच्या ह्या दीडशें कवितांच्या उभ्या काव्यसंग्रहांत फक्त ह्या एकाच कवितेला आहे. किंबहुना, उत्तर पाहिजे होतें, म्हणूनच गोविंदाग्रजांनी ह्या कवितेला 'कलगी' हें नांव दिलें. नाहीतर, खरोखरी हें नांव ह्या कवितेला देण्याचें कांहीच कारण नव्हतें. ह्या कवितेचा विषय, आणि वृत्त, ह्या दोहोंचाहि ह्या नांवाशीं कांहीच संबंध नाही. गडकरी ह्या कवितेंत शेवटीं शेवटीं म्हणतात,

"बोल बोलतों सलगीचे ।
गाणें माझें कलगीचें ।।
तोच तयावर करिल तुरा ।
वेडा जो मनिं खराखुरा ।
खराखुरा परि पुरापुरा ।
असला वेडा करिल तुरा ।।...
त्याला हें देतों गाणें ।
अर्थ जयाला मनिं वाणे ।।...
सवाल घ्या रे, । पुढें सरारे ।
तुरा करारे ।
बोल संपले सलगीचे ।
गाणें माझें कलगीचें " ।।

ह्या गाण्यांतील बोलांना "सलगीचे" हें केवळ यमकासाठी म्हटलें आहे असें वाटत नाही. अंतरंगांतील अनुभव सांगत आहेत, म्हणून गोविंदाग्रजांनी ह्या बोलांना "सलगीचे" असें सार्थपणें म्हटलें आहे असें वाटतें. ह्याच्या खालच्या गद्य टीपेंत ते म्हणतातः—तमाशांत कलगीच्या सवालाला तुऱ्याचा जबाब मिळतो; जगाच्या तमाशांत तरी तसें कां नसावें ?" 'मासिक मनोरंजनां'त ही कविता प्रथमच प्रसिद्ध झाली आणि मीं वाचली, तेव्हाच, मला ही कळते, असें मला दिसून आलें. आणि गोविंदाग्रजांचा तो उत्तरासाठी आग्रहहि पाहिला; म्हणून मीं त्यांचाच "तुरा" हा शब्द उचलून आणि तेंच वृत्त घेऊन, 'तुऱ्याचें गाणें' नांवाची ह्या कवितेला उत्तर म्हणून कविता लिहिली. तिचा प्रारंभच असा केला आहेः—

"गोविंदाग्रज कवि चतुरा ।
कलगीवरि तव ऐक तुरा ।।

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"वेडा" नच मी पुरापुरा। परि मी वेडा खराखुरा।
आहे वेडा खराखुरा। करि चतुरा म्हणुनीच तुरा॥
अर्थ मनाला मम बाणे। घेतों म्हणुनी तव गाणें॥
सवाल घेतों। तुरा करीतों। जबाब देतों।
गोविंदाग्रज कविचतुरा। कलगीवर तव ऐक तुरा॥"

आणि पुढे ह्या सव्वीस कडव्यांच्या कवितेंत, मीं आपल्याला मघा सांगितलेल्या अनुभवाचें संपूर्ण वर्णन केलें. ह्या माझ्या कवितेचा बराच इतिहास आहे. गडकऱ्यांचाहि परिचय असण्याचें मला सद्भाग्य लाभलें होतें. 'तुऱ्याचें गाणें' ही कविता प्रसिद्ध झाल्यानंतर माझी आणि गडकऱ्यांची पुण्याला जेव्हा पुनः गाठ पडली, तेव्हा ते ह्या कवितेबद्दल मला म्हणाले, 'तुमची कविता मला आवडली' हे त्यांच्या तोंडचेच शब्द दिले आहेत. मला दिसलेला 'कलगी' या कवितेचा अर्थ जर चुकीचा असता, तर गडकऱ्यांना 'तुऱ्याचें गाणें' कसें आवडलें असतें? आणि 'कलगी' चा जर मला दिसलेला अर्थ बरोबर असेल, तर मग मला 'मुरली' आणि 'प्रेमाचा प्रळयकाळ' या दोन कवितांत दिसलेला अर्थहि बरोबर असावा, असें मानण्यास जागा आहे. 'कलगी', 'मुरली', आणि 'प्रेमाचा प्रळयकाळ' अशा कवितांच्या प्रत्येक कडव्याचा विचार झाल्याशिवाय कांही जणांचें पूर्ण समाधान होणार नाही. पण आपल्याला अर्थात् प्रकृतस्थळीं तसें करण्याला अवकाश नाही.

'तुऱ्याचें गाणें' या कवितेशिवाय माझ्या 'कुंजवीणा', 'दृष्टादृष्ट व भेट', वगैरे कवितांत 'काव्यकल्पतरु'च्या कांही भागांत, 'अनन्ताची हाक' या खंडकाव्यांत आणि 'सर्वस्वाच्या गद्य गाण्यां'पैकी अनेक गाण्यांत वगैरे यात किंवा इतर अनुभवांचें किंवा त्यांच्या अंगोपांगांचें, अनेक स्वरूपांत वर्णन आलेलें आहे. असो.

तेव्हा, आपल्या अनुभवांतील सर्वांत असामान्य आणि उच्चतम आणि शब्दातीत, असा अनुभव चांगल्या रीतीनें वर्णन केल्यामुळे गोविंदाग्रजांच्या सर्व कवितांत 'प्रेमाचा प्रलयकाळ,' 'मुरली' आणि 'कलगी' ह्याच असामान्य आणि सर्वांत श्रेष्ठ कविता होत.

विदर्भ साहित्य संघ प्रकाशन, नागपूर

[मध्यप्रदेश सरकारचे मुख्य मंत्री माननीय पंडित रविशंकर शुक्ल यांनी पुरस्कृत केलेलें आणि मराठी भाषा शिकूं इच्छिणाऱ्या हिंदी भाषीयांसाठी अत्यंत उपयुक्त असलेलें पुस्तक]

हिंदी मराठी-भाषा-प्रवेशिका

लेखिका : मालतीबाई श्रीखंडे, एम्. ए., बी. टी. किंमत : सव्वा रुपया

एकमेव विक्रेते : कर्मवीर बुकडेपो, महाल, नागपूर २

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कां ही क वि ता

मायाजाल

वाकल्या पडक्या घराची ही एकली खोलि आहे
हात लागा भूमिला ही नेहमीची ओलि आहे ।।१।।

अंधकाराला बघाया चांदण्याचें तेज आहे
पुष्पशय्या केवि त्याला फत्तराची सेज आहे ।।२।।

नेसण्याला ना पुरेसें फाटकें हें वस्त्र आहे
जेवणाला अन्न नाही रोदनाचें अस्त्र आहे ।।३।।

भांडिकुंडीं ना घराला मातिचा संसार आहे
लेकरांचा मात्र मोठा वाढता विस्तार आहे ।।४।।

फासळ्यांच्या या कुडीचा भीतिप्रद शृंगार आहे
जीवनाच्या मतिकाचा पेटता अंगार आहे ।।५।।

जीवनाची भक्ति नाही जीवनीं आसक्ति आहे
मोह माया मत्सराला मृत्यु ही कां मुक्ती आहे ? ।।६।।

मानवाचा जन्म त्याचा हाच कां आदर्श आहे ?
मृत्यु आणी जीवनाचा हा खरा संघर्ष आहे ।।७।।

त्यांतही माझें तुझें अन् बिबलेला स्वार्थ आहे
ईश्वरी मायावितेचा हा खरोखर अर्थ आहे ।।८।।

सौ. उषा लिमये

प्रिया दचकली

रम्य सागरीं
मंगल मोहक प्रभातकालीं
नौकेवरती
प्रिया दचकली !

प्रमत्त वावळ झाली पिंगा
करिति गर्जना विराट लाटा
गरगर फिरले खोल भोवरे फिरवित डोळे
झाला दर्या गढूळ घुसळुन
रूप दचकवी क्रुद्ध रौद्र तें !
प्रसंग अगदी मिळावयाचा जलीं समाधी
प्रिया तरीही नच डगमगली
साह्य करी मज आटोपाया शीड जलदिनें
परी सर्व तें काल दुपारीं !

गाढ तमाचें अभेद्य वेष्टन पडलें भवतीं
कुठे न कांही पडे दृष्टिला
नभीं असावा नभा व्यापुनी
काळा काळा विशाल एकच वर्षाढग तो !
पर्जन्याच्या सरी तुफानी
एकीमागुन क्षणांत दुसरी
प्रचंड विस्तृत नभःशिलेच्या माथ्यावरुनी
जणूं धवधवा तलीं कोसळे
गार गार ये असह्य वारा
गोठुन गेलें रक्त शरीरीं
दिशा कळे ना मला सुचे ना
प्रिया तरीही निराश न मुळीं
धीर देइ मज परोपरीने
परी सर्व तें रात्रि कालच्या !

थाटे मंगल प्रभात आता
पूर्व दिशेला बिंब गुलाबी
प्रशांत सागर अभ्रें तुरळक ऊन गुलाबी
नील नभींचा अधीर वारा
शिडांत बळकट
दिसे किनारा समोर अगदी
तीर सुटावा धनुर्धारिचा
जाई नौका
तीर निघाला तीर गाठण्या !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आणि बचकली
मुटे मुकाणूं
पडतां छाया
समोर माझी
उत्साहें मी
घ्याया चुंबन

प्रिया अचानक
तिच्या करींचें
प्रदीर्घ कृशतम

जाउं लागतां
आलिंगाया !

विचारमग्ना

—द. चिं. सोमण

चोरखणाला चारच भिंती ?

कोण सांगतो कोण सांगतो
चोरखणाला चारच भिंती ?
असंख्य भिंती, त्यांतुन पुन्हा–
कप्पे कप्पे नाही गणती !

वाटीने पण शिस्तीनेही––
सगळा यांतुन माझा ऐवज,
कुणा–कुणावर डल्ला मारुन
एक-एकटे धरलें सावज !

हवेंच जें तें मिळतें चटकन्
करावयाला चोळामोळा !
[फुगीर मांड्या,-गाल गुलाबी–
–कुस्करण्याचा माझा चाळा ! !]

येथे बारिक रोमाहुनही–
लांब लांबचे जुडले तंतू !
या कप्प्यातुन पिवळे लाघट–
वळवळणारे ओंगळ जंतू ! !

येथे कांही नवेंच होतें,–
रंग बदलती इथे कुणाचे;
निःश्चल मुडदा येथे येतां––
तालावरती हासे नाचे !

अशा मनाच्या माझ्या भिंती
त्यांतच चिणली माझी शांती ! !

—जगन्नाथ टंकसाळी

ढगांत काळ्या—

ढगांत काळ्या रडे चांदणी
गालावरुनी उतरे पाणी
पिसाटलेला वाहे वारा
विसावलेल्या छेडित तारा ।

आज इथे मी लिहितों गाणीं
हिरव्या पिवळ्या पिंपळ पानीं
त्यांत उमटते तुझीच हुरहुर
दुभंगलेलें उदास काहुर !

जिथे घेतला काल विसावा
तव अधरीचा ऐकत पावा
तिथेच माझी श्रांत हरपली
खटचाळ उन्मन जगावेगळी !

धुळींत काळ्या घेइ विसावे
श्रमले दमले जिथे पारवे
त्याच धुळीची घटका जिवा या
हवी मला ती जळती छाया

जळती छाया, सरत्या रात्री
हवी मला ती काळी माती
तुझ्या नि माझ्या मधलें अंतर
जळत रहावें नित्य निरंतर !

ढगांत काळ्या रडे चांदणी
वारा गाई अपुलीं गाणीं
नीरव त्यांतुन शब्द उमटतो
फुलवित सखये अपुली प्रीति !

—बाबा मोहोड

☆

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

निरुपाय !

तगमग अंतरीची
दीनरात स्वप्नमय
सांगायची कशी आता
गडे, माझा निरुपाय !

तुजसवें फिरतांना
होती माझ्या वृत्ति मूक
परी दृष्टिआड जातां
पेटे अनावर भूक

खुणगाठ बांधतसे
भांडायचे तंडायचे
पाहताच मुर्तीमंत
झुकें पातें पापणीचें

सारें कांही बोलायचें
घोकतसे नित मन
आटतात शब्द-सरी
ओठ जास्वंदी पाहून

तगमग अंतरीची
दीन रात स्वप्नमय
सांगायची कशी आता
गडे, माझा निरुपाय !

—तुळशीराम काजे.

नदी

धुंदावल्या नागिणीवाणी
लहरत लहरत
वाहते नदी
आपुल्याच तंद्रीमध्ये
कसल्यातरी संथ निळया गुंगीमध्ये

मुद्दाम अशी आखलेली
वाट नाहीं
वाहेल तसा
वाहेल तिकडे चालणारा
उद्दाम एक
लोटलेला ओघ आहे !

काठीं कुठें
उधळलेला वनश्रीचा हिरवा थाट
तीरापाशीं चमचमणारी
काळीनिळी तलम वाळू
गावालगत काठावर–काठाशींच
जागजागीं मानवानें
ठेवलेली करून घाण
हिला परी
कशाचें ना मुळी भान !

"घाण, घाण अहो घाण
काय तरी घाण बुवा हिच्या काठीं"
मुरडतात केव्हाकेव्हा नाकें जन
थरारतें खवळतें
तेव्हा हिचें संथ जळ
करतें धारण
पावसाळीं विशालकाय उग्र रूप
नेतें वाहून घाण सारी
दूर दूर
आणि कळतें तेव्हा हिला
आपुलेंच सुप्त बळ
जाणवतें
चैतन्याचा नवाच वेग
आपणांमध्ये वसत आहे !

दिशाहीन वाट हिची
परी हिला चालणेंच प्राप्त आहे !
तरी देखील...
तरीदेखील सागराला शेवटीं
भेटणेंही ठाउक आहे !

—उ. रा. गिरी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रस्किन्‌ची 'पॅथेटिक फॅलेसी'

लेखक—भगवन्त प्रल्हाद मोहरीर, नागपूर

आधुनिक टीकेची सांगता 'अंतर्लक्षी' व 'बहिर्लक्षी' या आंग्ल पर्यायावाचून होणें कठीण आहे. रस्किन या सुविख्यात पाश्चात्य विवेचकाच्या मतें हे दोन्ही शब्द अत्यंत आक्षेपार्ह आहेत. कवीची काव्यलेखनप्रसंगीं होणारी तन्मयता काव्यवस्तूंत उतरून तींत त्याच्या भावविशेषांचे संस्कार एकजीव झाले म्हणजे एक प्रकारची अंतर्लक्षिता उत्पन्न होते किंवा जेव्हा वस्तुप्रतिपादन करतांना कवीच्या दृष्टीसमोर वर्ण्य विषयच तेवढा प्रकट असतो तेव्हा बहिर्लक्षिता गर्भित असते.

कवीचे तीन वर्ग

या दोन संज्ञांना रस्किनने "अत्यंत आक्षेपार्ह शब्द" (Most objectionable words) म्हणून कां संबोधावें हें समजणें फारसें कठीण नाही. तो म्हणतो, "एकादी वस्तु बहिर्निष्ठतेने अशी आहे असें म्हणण्यापेक्षा 'ती अशी आहे' किंवा आत्मनिष्ठतेने अशी आहे असें म्हणण्यापेक्षा 'मला ती अशी दिसते' असें म्हटल्यास या अतिप्रचलित शब्दांची सद्दी संपावयाला फारसा अवधि लागावयाचा नाही." तरी तत्त्वज्ञ किंवा काव्यसंशोधक काव्याची प्रतवारी ठरवितांना या दंडकांचा उपयोग केल्यावाचून राहावयाचा नाही. एवढेंच नव्हे, तर रस्किनसारख्या टीकाकारानेही काव्यलेखकाचे सोईस्तव तीन वर्ग याच कसोटीवर कल्पिलेले आहेत. गुलाबपुष्प तंतोतंत गुलाबपुष्पाप्रमाणे ज्यांना दिसतें तो पहिला वर्ग; गुलाबपुष्प त्याव्यतिरिक्त कांहीतरी वेगळें दिसतें त्यांचा दुसरा वर्ग आणि गुलाबपुष्प वेगळ्या अनुभूतींनी व साहचर्यांनी संबद्ध असतांना देखील एक लहानसें सुगंधी गुलाबी फूल अशी ज्यांची प्रतीति झालेली असते अशांचा तिसरा वर्ग. पहिला वर्ग 'अ'कवींचा; दुसरा वर्ग दुय्यम कवींचा तर तिसरा कविश्रेष्ठांचा होय ! शेक्सपियर, दान्ते इत्यादींचा समावेश या श्रेणींत करतां येईल तर दुय्यम वर्गांत कीटस्, शेले, बायरन् इ० दाखल होतात. काव्यांतील करुणाजनक हेत्वाभासाला (Pathetic Fallacy) याच कवींच्या काव्यांत अवसर मिळतो; असें रस्किनचें मत आहे.

कवींचें मानसशास्त्र

काव्यांतर्गत करुणाजनक हेत्वाभासाचा कवीच्या मानसशास्त्राशीं संबंध आहे. वर्ण्यविषयावरोबर तद्रूप झालेल्या कवीच्या मनोवृत्ति अनावर झालेल्या असतात. विशेषतः वियोगसंकुल झालेल्या क्षुब्ध मनाला बाह्य वस्तुमात्रांतहि त्याच्या वृत्ति प्रतिबिंबित झालेल्या आढळून येतात. हें निसर्गाचें कार्य सहज असलें तरी त्यावर कवि आपल्या मनोवृत्तींचा आरोप करितो व कविप्रवृत्ति व निसर्गप्रवृत्ति यांची संगति उठावदार करण्याचा प्रयत्न करीत असतो. रस्किनच्या मतें काव्यांत हेत्वाभासाचा संभव होणें हाच मुळी कवीचा वृत्तिदोष आहे. अभिजात प्रतिभावंतांच्या ठिकाणीं भावनेच्या उद्दामपणालाहि मर्यादा असतात. भावसंयमाचें शिक्षणहि त्याला उपजतच लाभलेलें असतें. भावनांचें ताण्डवनृत्य चाललेलें असतांना विवेकाचे वागुर त्याला ओढल्या-

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाचून राहत नाही. दुय्यम दर्जाच्या कवीच्या मनस्तापाचे पाट दुथडी वाहूं लागतात व भावनाप्रक्षोभ असह्य झाल्यामुळे विवेकाचेंहि नियंत्रण शिथिल झाल्यासारखें वाटतें.

कवि व निसर्ग

कवि व निसर्ग यांचें साहचर्य फार पुरातन आहे. कवि आपल्या काव्यांतून निसर्गाचा उपयोग वेगवेगळ्या पद्धतीने करून घेतो. एका पाश्चात्य विवेचकाने या पद्धतीचें चार भिन्न-प्रकारांत वर्गीकरण केलेलें आहे. स्थूलमानाने दोन पद्धति टीकाशास्त्रांत प्रचलित समजल्या जातात. वस्तुगत Objective व आत्मगत Subjective. प्रो. बेहेरे यांचा 'वसंत' हा वस्तुगत काव्यांत दाखल होईल, तर केशवसुतांचा 'नैऋत्येकडील वारा' आत्मगत काव्यांत समाविष्ट होईल. या, ठोकळ वर्गांतही अनेक प्रकारभेद पाडले. 'Preraphalites', 'Pantheists', 'Naturalists' हे याच प्रकारभेदांपैकी आहेत. या एकएका विशेषणाने, टेनिसन, वर्डस्वर्थ, शेले यांच्या निसर्गविषयक कवितांचा उल्लेख करण्यांत येतो. काव्यांत हेत्वाभासमूलक निसर्गाचा उपयोग आत्मगत काव्यांत होतो. निसर्ग ही मनुष्याच्या विकारांचें छायाचित्र म्हणून पार्श्वभूमि ठेवण्यांत आली तर बरें. एरवी निसर्ग व कवि यांच्या द्वैताचा निरास झाला की आभासात्मक सत्याचा प्रवेश काव्यवर्णनांत झाल्यावाचून राहत नाही.

डॉ. वाटवे व करुणाजनक हेत्वाभास

रस्किनच्या 'Pathetic fallacy'चा अर्थ समजून घेतल्यानंतर मराठी पण्डितांनी त्याचा कोठे व कसा परामर्ष घेतला हें पाहणें आवश्यक आहे. डॉ. वाटवे यांनी रसाच्या व्यापक व्याख्येला जगन्नाथाच्या विचारसरणीने कसा बाध येतो हें दाखवितांना "जलप्रवाहादि वर्णनांत रसलेश असतो व कवि काव्यांतील वस्तूंचीं व निसर्गाचीं वरीच वर्णनें विशिष्ट भावनांशीं रंगवीत असतो, कालिदासाचा 'ऋतुसंहार' 'रत्नावलि' रेंदाळकरांचें 'प्रबोधन' इ० सृष्टिवर्णनें भावनांशीं रंजित आहेत." असें विधान केलें आहे. त्यांच्या मतानुसार रस्किनच्या 'Pathetic Fallacy'चा हाच अर्थ होय. किंबहुना कालिदासाच्या ऋतुसंहारापासून रेंदाळकरांच्या प्रबोधनापर्यंत हीं सर्व हेत्वाभासाचीं उदाहरणें होत. वाटव्यांच्या या विचारपद्धतीप्रमाणे वस्तुगत निसर्गकाव्य वगळून सारेंच आत्मगत निसर्गकाव्य या काव्यप्रकारांत अंतर्भूत होऊं शकेल. पण खुद्द रस्किनला 'Pathetic Fallacy' चा एवढा व्यापक अर्थ मुळीच मान्य नाही. शेक्सपियर–कालिदास यांच्यासारखे पहिल्या दर्जाचे (Poets of the first order) कवि हेत्वाभासाच्या जाळ्यांत अडकण्याचा प्रयत्न करीत नाहीत. एवढेंच नव्हे तर कवीच्या काव्यांतून असलेल्या हेत्वाभासाचा आढळ झाल्यास रस्किन त्या कवीची दुय्यम प्रतीच्या कविमालिकेंत गणना करी. In ordinary poetry, it is found in the thoughts of the poet himself, it is at once a sign of his belonging to the 'Inferior School'. कवीच्या आंतर मनाची दुबळीक हेंच हेत्वाभासाच्या उत्पत्तीचें मूलकारण आहे, असें तो प्रतिपादन करतो. विकृत भावनांनी प्रक्षुब्ध झालेल्या कवीच्या दृष्टीवर सांवट असल्यामुळे सत्याची प्रतीति त्याला होत नसून त्याकडे वेगळ्याच आभासात्मक स्वरूपांत तो पाहण्याचा प्रयत्न करितो. सर्वच आत्मगत सृष्टिवर्णनात्मक काव्यांत या सत्यप्रतीतीचा विपर्यास (Fallacy) मुळीच नसतो किंवा कसल्याहि वृत्तिदोषाचा संपर्क कवीच्या आंतर मनाला लागला असें म्हणणें बरोबर होणार नाही. वाटव्यांनी उल्लेखिलेल्या ऋतुसंहार या काव्यांत सत्याभास नाही, सत्याचा विपर्यास नाही किंवा सत्याची प्रतारणा नाही. यांपैकी कोणतेंही काव्य कवीच्या वृत्तिदोषांतून उद्भवलेलें नाही. कालिदासाचें कविमन निकोप प्रसन्न होतें. धूसरितपणाची कसलीहि छाया त्याच्या कवितेंत आढळणें कठीण आहे. 'ऋतुसंहारां'त मानवी मनावर ऋतुपरिवर्तनाचे विलोभनीय परिणाम कालिदासाने रसराज शृंगाराच्या साह्याने काव्यांतर्गत केलेले आहेत. 'प्रबोधनां'त तरी सत्यविपर्यासाचा प्रसंग दाखवितां येईल काय ?

सारांश, डॉ० वाटवे म्हणतात त्याप्रमाणे (१) कवि निसर्गाचीं वर्णनें विशिष्ट भावनांशीं रंगवीत असतो.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(२) हीं सारींच वर्णनें आत्मगत असल्यामुळे हेत्वाभासमूलक आहेत. (३) 'ऋतुसंहार', 'रत्नावलि' हीं याच हेत्वाभासाचीं उदाहरणें आहेत. ही विचारसरणी समर्पक नाही. रसतत्त्वाच्या अतिसूक्ष्म तपशिलांत शिरल्यामुळे डॉ० वाटव्यांकडून रस्किनप्रणीत हेत्वाभासाचा विपर्यास झाला आहे.

काव्यात्मक हेत्वाभासाचीं उदाहरणें

डॉ० वाटव्यांचा तथाकथित 'काव्यात्मक हेत्वाभास' व रस्किनला गर्भित असलेला हेत्वाभास यांत निःसंशय अंतर आहे. जें जें आत्मगत निसर्गकाव्य तें डॉ० वाटव्यांच्या मताप्रमाणे हेत्वाभासमूलक; ही व्याख्याहि बरोबर नाही. याप्रमाणे पाहिल्यास 'पुष्पाप्रत', 'संध्याकाळ', 'नैऋत्येकडील वारा', 'म्हातारी' या केशवसुतांच्या आत्मलक्षी काव्यास खचित अन्याय झाल्यावाचून राहणार नाही. कवीने सृष्टिजीवन व मानवी जीवन यांच्यांतील विरोधात्मक प्रत्यय नजरेस आणण्याचा प्रयत्न केला. आभासमूलक संगति नव्हे. सत्यप्रतीतीवर कवीचा भर आहे. येथे निसर्गवस्तू काव्यकल्लोळ निर्माण करण्यास कारणीभूत झालेल्या आहेत. कवीने अनावर वृत्तिवैकल्य ठेवून निसर्गाच्या क्रियांचा समाचार घेतला नाही. 'पडलेल्या ताऱ्यांस' ही गिरीश कवींची कविता हेत्वाभासाचें उदाहरण म्हणून पहा—

या दिशा येउनी हुन्दके देउनी
अश्रु वा वर्षती सारख्या स्फुन्दुनी.
दिव्यगङ्गा अशी जाहली पाण्डुरा
अश्रु ढाळूनिया दीन झाली धरा. (काञ्चनगंगा)

यापेक्षाहि बहारदार उदाहरण 'मरणकाल' या केशवसुतांच्या कवितेंतील आहे.

कारण नंतर पहाट आली, अन्धुक उदास तैशी
आणि हिमाच्या वर्षावाने काकडलेली ऐशी"

हीं उदाहरणें विस्तारभयास्तव पुरेत.

प्रा० जोगांचा "प्रकाश"

